# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १४ मार्च, २०१६ / फाल्गुन २४, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(३)** | **उद्योग मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५)** | **सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ११३**

---

**गगनबावडा ते विजयदुर्ग (जि.सिंधुदुर्ग) या राज्य महामार्गाची झालेली दुरावस्था**

**(१) * ४०८६० श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गगनबावडा ते विजयदुर्ग (जि.सिंधुदुर्ग) या राज्य महामार्ग क्र.१७७ ची अत्यंत दुरावस्था झाली असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने रस्त्यांवर वारंवार अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच या राज्यमार्गावरील ५३/७८८ ते ८५/०० (उजव्या बाजूला) एकूण ३१.२१२ मीटर लांबीत रस्त्याच्या मध्यापासून ९.०० मीटर अंतरावर रस्त्यावर व खोलीत १.६५ मीटर खोदकाम करुन ऑप्टीकल फायबर केबल टाकण्याकरिता मे.रिलायन्स जीओ इन्फोकॉम लि. मुंबई या कंपनीस सार्वजनिक बांधकाम विभागाने परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मात्र रस्त्याच्या मध्यापासून १५ मीटरपर्यंत खोदकाम न करणे बंधनकारक असतांना कंपनीने ९ मीटर अंतरावरुनच खोदकाम केल्याबाबतची तक्रारी ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार केल्या असून या रस्त्याची दुरुस्ती विनाविलंब करण्यात यावी या मागणीचे एक निवेदन देखील स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास सार्वजनिक बांधकाम मंत्र्याची प्रत्यक्ष भेट घेवून सुपूर्द केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदरहू रस्त्याचे विनाविलंब मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अतिवृष्टी व अवजड वाहतुकीमुळे रस्त्यावर खड्डे पडले होते हे खरे आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे जेथे रस्त्याच्या मध्यापासून १५ मीटर अंतरावर ऑप्टीकल फायबर केबल टाकणे शक्य नसेल तेथे तेवढ्या लांबीत केबल तात्पुरत्या स्वरुपात टाकण्यात यावी अशी अट शासनाने दि. २०/११/२०१५ रोजी दिलेल्या परवानगीमध्ये नमूद आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे व राज्य शासनाने दिलेल्या परवानगी प्रमाणेच केबल टाकण्याचे काम संबंधित कंपनीमार्फत करण्यात येत आहे. सदर केबलसाठीचे खोदकाम डांबरी पृष्टभागावर अथवा रस्त्याच्या साईड पट्टीवर येत नाही. त्यामुळे वाहतुकीस कोणतीही अडचण होत नाही.

रस्त्यावरील पावसाळ्यात पडलेले खड्डे डांबर मिश्रित खडीने भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) येथील मुलींच्या वसतीगृहात योग्य आहार व सुविधा मिळत नसल्याबाबत

**(२) * ४५४०२ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज (जि.कोल्हापुर) येथे असलेल्या मुलींच्या वसतिगृहातील मुलींना योग्य आहार व सुविधा मिळत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच प्रांताधिकारी यांनी सदर वसतिगृहास मुलीच्या तक्रारीच्या अनुषंगाने भेट दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर वसतिगृहाचे व्यवस्थापकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) ते (३) होय.

(४) गृहपाल, मुलींचे शासकीय वसतिगृह, गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर यांचेविरुद्ध कारवाई प्रस्तावित करून त्यांची कणकवली येथे बदली करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर-सांगली महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३) * ४४७२० डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर**

**(शाहूवाडी), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर-सांगली महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सुरु असून रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या बांधणीचे काम झाले असून जमिनीपासून दहा फूटापर्यंत काही ठिकाणी उंची वाढल्याने रस्त्याकडेला धोकादायक उतार निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोकादायक उतारामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या महामार्गावर हालोंडी (ता.हातकणंगले) येथील पूलावरील काम दीड वर्षापासून तसेच शिरोली नजिकच्या रस्त्यावरील कामेही रखडली आहेत, असल्यास, यामुळे याठिकाणी अपघातांचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या महामार्गाचे काम अर्धवट अवस्थेत असल्याने प्रदूषण व धुराळ्यापासून रस्त्यांच्या कडेला असणाऱ्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून शासन या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणार आहे काय,

(५) असल्यास, या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

सदर रस्त्याचे चौपदरीकरण करणेसाठी आवश्यक असणाऱ्या भारतीय रस्ते महासभेच्या मानकाप्रमाणे रस्त्याचे चढ-उतार ठेवणेत आलेले आहेत. तसेच सदर काम अद्याप प्रगतीत आहे.

(२) हे खरे नाही.

सदर ठिकाणी कोणतीही अपघाताची घटना घडल्याची नोंद नाही.

(३) हे खरे नाही.

हालोंडी येथील पूलाचे काम पुर्ण झाले असून त्या ठिकाणचे चौपदरीकरणाचे काम सुध्दा पूर्ण झाले आहे. त्याचप्रमाणे शिरोली हद्दीतील मुख्य रस्त्याचे काम पुर्ण झाले असून सेवा रस्त्याचे काम प्रगतीत आहे.

(४) या रस्त्याचे चौपदरीकरणासाठी भूसंपादन करणेत आलेल्या जमिनीच्या मालकांना शासकीय नियमानुसार नुकसान भरपाई देणेत आलेली आहे.
(५) रस्त्याचे काम निकृष्ट झाले आहे हे म्हणणे खरे नाही. सदरचे काम निविदा अटी व शर्तीनुसार चालू आहे.

-----------------

**चाकण (ता.खेड,जि.पुणे) येथे वसतिगृह बांधण्याबाबत**

**(४) * ४५६६९ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड तालुक्यातील (जि.पुणे) दुर्गम भागातील ठाकर, कातकरी, महादेव कोळी या आदिवासी कुटुंबांची मुले आणि मुली शिक्षणासाठी चाकण शहरात येत असल्याने चाकण येथे वसतिगृह बांधण्याबाबत विभागीय प्रकल्प अधिकारी, घोडेगाव यांनी शासनास प्रस्ताव पाठविल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९ जानेवारी,२०१६ रोजी आदिवासी विकास मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने प्रस्तावास मान्यता देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) प्रकल्प अधिकारी, घोडेगाव यांनी अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींकरिता शासकीय वसतीगृह मंजूरीचा अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्याकडे सादर केलेला प्रस्ताव, अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये पाठविला असल्याची बाब खरी आहे.
(२) हे खरे आहे.
(३) राज्यातील विविध भागातील लोकप्रतिनिधींची मागणी लक्षात घेऊन, राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या व त्यानुषंगाने अतिरिक्त शासकीय वसतीगृहाची निकड लक्षात घेऊन त्याप्रमाणे नवीन वसतीगृह मंजूरीसाठीचा एकत्रित प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना कळविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------

**हातरुंडी-दाभाडी (ता.पेठ,जि.नाशिक) या रस्त्याच्या बांधकामाबाबत**

**(५) * ४७२९३ डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठ तालुक्यातील (जि. नाशिक) हातरुंडी-दाभाडी रस्त्यावर चार महिन्यांपूर्वी डांबरीकरण करण्यात आले असून नव्याने पूर्ण झालेला रस्ता खोदून मोरीचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामान्यत: रस्ता बांधण्यापूर्वी मोरीचे बांधकाम करणे अपेक्षित व आवश्यक असताना हातरुंडी रस्त्यावर आधी रस्ता मग तयार झालेला रस्ता खोदून मोरी व पुन्हा नवा रस्ता अशी अजब कार्यपध्दती अवलंबिली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार यात दोषी असणाऱ्या अधिकारी व कंत्राटदाराविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

विषयाधीन रस्त्यावर किमी ६/६०० मधील मोरीच्या बांधकामास शेतकरी श्री.प्रभाकर यशवंत सातपुते यांनी हरकत घेतल्यामुळे मोरी बांधकामाच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपाचे डांबरीकरण ठेकेदाराने स्वखर्चाने केले होते. यात केवळ लगतच्या डांबरीकरणाचे नुकसान होऊ नये व वाहतूक सुरळीत व्हावी हा उद्देश होता.

(३), (४) व (५) अनियमिततेची बाब नसल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सहकारी औद्योगिक वसाहतींना सुकाणू समितीने घातलेल्या जाचक अटींबाबत**

**(६) * ४४९५० श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम),**

**श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३ अंतर्गत राज्यातील १४ सहकारी औद्योगिक वसाहतींना पायाभूत सुविधाबाबतचे प्रस्ताव दाखल केलेले होते, त्यापैकी पाच सहकारी औद्योगिक वसाहतींचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत, त्यामध्ये सहकारी औद्योगिक वसाहतींना २५-७५ या आकृतीबंधाऐवजी आता शासनाने ५०-५० या आकृतीबंधास काही अटींसह अर्थसहाय्य देण्याबाबतच्या उदयोग संचालनालयाच्या पत्रास दिनांक ६ जून, २०१५ अन्वये सुकाणू समितीने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुकाणू समितीने जाचक अटी घातल्याने कोणतीही सहकारी औद्योगिक वसाहत त्या पूर्ण करु शकत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या जाचक अटी दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय.

(२) नाही.

औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मिती व विकास यासंदर्भात मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१.१२.२०१५ रोजी झालेल्या सुकाणू समितीच्या तिसऱ्या बैठकीमध्ये सहकारी औद्योगिक वसाहतींच्या मागणीस अनुसरुन २५-७५ अशा सुधारीत आकृतीबंधास समितीने मान्यता दिली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या वाहतूक दरामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(७) * ३९७००  श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.जयकुमार**

**गोरे (माण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :**
सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या अन्न धान्य वाहतूकीचे दर जास्त असून कंत्राटदारांना करोडो रुपयांची खैरात देण्यात असल्याची तक्रार मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास केंद्रीय वखार महामंडळ टनामागे रु. १४६ वाहतूक व हाताळणी देत असताना, राज्य वखार महामंडळ याच कामासाठी टनामागे रु. ८०० अदा करते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास दोन महामंडळांच्या वाहतूक दरात प्रचंड तफावत असून त्यामुळे राज्य शासनाच्या तिजोरीला करोडो रुपयांचा फटका बसत आहे, तसेच, जालना, लातूर, मोरगाव, अर्जुनी (गोंदिया), बारामती, सातारा, परभणी येथील वखार केंद्रात आधारभूत दरापेक्षा ३०० ते ५०० टक्के जास्त वाहतूक दर सन २०१३ ते २०१५ या दरम्यान देण्यात आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने काही चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, अशाप्रकारे शासनाची फसवणूक करून राज्याचे आर्थिक नुकसान करणा-या कंत्राटदारांवर व त्यांच्याशी संगनमत करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राज्य शासनाच्या तिजोरीला फटका बसतो हे खरे नाही. मात्र निविदेमध्ये आधारभूत दरापेक्षा १६७% ते ३९८% जास्तीच्या किंमती मान्य झाल्या आहेत. ज्या CWC व FCI च्या दराच्या जवळपास समान आहेत.

(४), (५) व (६) निविदा प्रक्रियेच्या संबंधात आलेल्या तक्रारीची शासन स्तरावरुन तपासणी सुरु आहे.

-----------------

**उदगीर (जि.लातूर) येथे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याबाबत**

**(८) * ४४७४३ श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने १२ हेक्टर ८६ आर जमीन संपादीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिकीकरणाच्या बळकटीकरणासाठी शेतकऱ्यांनी संमती दिली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त औद्योगिक क्षेत्र विकसित व्हावे यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) उदगीर विकास केंद्रासाठी (जि.लातूर) १२.८६ हे.आर क्षेत्र अधिसूचित करण्यासंबंधीची अधिसूचना दिनांक २७/१०/२००५ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(३) व (४) उदगीर लघु औद्योगिक विकास केंद्रासाठी अधिसूचित करण्यात आलेल्या क्षेत्रासंदर्भात संबंधित खातेदारांसोबत वाटाघाटीने नुकसान भरपाईचे दर

ठरविण्यात आले होते. परंतु, वाटाघाटीने दर निश्चित झाल्यानंतरही बाजारभावाप्रमाणे मोबदला द्यावा अशी मागणी करुन शेतकऱ्यांनी मोबदला घेण्यास नकार दिला व मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन दाखल करुन वाटाघाटीने ठरलेल्या दरानुसार केलेला निवाडा रद्द करुन जमिनी भूसंपादनातून वगळण्याची मागणी केली होती. त्यामुळे सदर औद्योगिक क्षेत्रासाठी संपादित केलेले क्षेत्र लहान असल्याने तसेच कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करणे आर्थिकदृष्टया महामंडळाला परवडणारी नसल्याने सदर औद्योगिक क्षेत्र रद्द करण्यासंबंधीचा प्रस्ताव महामंडळाने सादर केला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात नविन महिला उद्योग धोरण राबविण्याबाबत**

**(९) * ४४१७६ श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उद्योगांमध्ये महिलांना संधी देण्यासाठी राज्यात लवकरच नविन महिला उद्योग धोरण राबविण्यात येणार असल्याची मा.उद्योगमंत्री यांनी माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात घोषणा केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी महिला उद्योग धोरणाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हिंगोली जिल्ह्यात औद्योगिक विकास महामंडळाच्या लिंबाळा मक्ता औद्योगिक वसाहतीला जोडणाऱ्या रस्त्याच्या चौपदरीकरणाबाबत**

**(१०) * ४५६२१ श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली या उद्योग नसलेल्या जिल्ह्यात औद्योगिक विकासाला चालना मिळावी या करीता पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे दृष्टीने हिंगोली येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या लिंबाळा मक्ता औद्योगिक वसाहतीला जोडणाऱ्या रस्त्याचे चौपदरीकरण करण्यात यावे, अशा आशयाचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. राज्यमंत्री, उदयोग व मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांना माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनासंदर्भात शासनाकडून काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) सदरहू रस्त्यांचे चौपदरीकरणाचे काम निश्चित किती कालावधीत मंजूर करुन पूर्ण करण्यात येईल ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हिंगोली जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातून जाणाऱ्या रस्त्याच्या हिंगोली, औंढा, हट्टा, पुर्णा, धनगर टाकळी राष्ट्रीय महामार्ग क्र. २४९ च्या ४/०० ते ६/०० चे किमी लांबीचे (मौजे लिंबाळा मक्ता) चौपदरीकरणाच्या कामाचा प्रस्ताव व हिंगोली औद्योगिक क्षेत्रातील ४ कामे व ९.२०० कि.मी. लांबीची कामे अंदाजित किंमत रु. ९२.०० कोटीचे प्रस्ताव अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांच्याकडून मुख्य अभियंता, औरंगाबाद यांच्याकडे सादर करण्यात येत आहे.

-----------------

## बुलडाणा जिल्हयातील जळगांव, जामोद व संग्रामपूर तालुक्यातील आदिवासी समाज शासकिय योजनांच्या लाभापासून वंचित असल्याबाबत

**(११) * ४७७६९ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हयातील जळगांव, जामोद व संग्रामपूर तालुक्यातील सातपुडा पर्वत रांगामध्ये धनके, भिलाला, बारेला व पावरा या आदिवासी समाजाचे गेल्या अनेक वर्षापासून वास्तव्य आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासी समाजाचा समावेश शासनाच्या अनुसूचित जमातीच्या विहीत सूचीमध्ये केला गेलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास त्यामुळे आदिवासी समाजातील लोक अनेक शासकीय योजनांपासून वंचित राहत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आदिवासी जमातीचा समावेश शासनाच्या अनुसूचित जमातीच्या विहीत सुचीमध्ये करुन त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय. बुलडाणा जिल्हयातील जळगांव जामोद व संग्रामपूर या दोन तालुक्यात भिलाला, पावरा या अनुसूचित जमातीचे वास्तव्य आहे. परंतु धनके आणि बारेला संदर्भात निश्चित माहिती उपलब्ध नाही.

(२) मा.राष्ट्रपतींच्या दिनांक ६.९.१९५० च्या पहिल्या आदेशामध्ये तसेच संसदेने वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी घोषित केलेल्या अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये अ.क्र.८ वर भिलाला, पावरा आणि अ.क्र.१३ वर धनका अशी नोंद आहे.

तथापि, सदर यादीमध्ये बारेला अशी नोंद आढळून येत नाही.

(३) "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००" अंतर्गत तयार केलेले "महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे

विनियमन) नियम, २००३," मधील नियम ४ नुसार दि.६.९.१९५० म्हणजे मा.राष्ट्रपतींच्या अधिसूचनेच्या दिनांकास महाराष्ट्रातील सर्वसाधारण रहिवासी व्यक्तीला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याची तरतुद आहे. तसेच त्यांना अनुसूचित जमातीचे लाभ अनुज्ञेय आहेत.

तसेच नियम ५ मधील तरतुदीनुसार दिनांक ६.९.१९५० रोजी किंवा नंतर दुसऱ्या कोणत्याही राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतर केलेल्या अर्जदारास नमुना क-१ मध्ये प्रमाणपत्र देण्याची तरतुद आहे. तसेच नियम ५ (१) (ग) मध्ये शिक्षण, रोजगार इत्यादी मिळण्यासाठी आपल्या मूळ राज्यातून महाराष्ट्रात स्थलांतरीत झालेला अनुसूचित जमाती प्रमाणपत्रधारक त्याच्या मूळ राज्याच्या अनुसूचित जमातीचा असल्याचे मानण्यात येईल आणि महाराष्ट्र राज्यात नव्हे तर त्याच्या मूळ राज्यात लाभ मिळण्यास तो पात्र असेल, अशी तरतूद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शहापूर (जि.ठाणे) येथे मुलांचे व मुलींचे वसतिगृह सुरु करण्याबाबत**

**(१२) * ४७८२६ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथे ४ इंजिनिअरिंग महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाविद्यालय असल्याने या ठिकाणी शहापूर तालुक्यातील आदिवासी विद्यार्थी मोठया प्रमाणात शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर येथे ५०० विद्यार्थी क्षमता असलेले वसतिगृह सुरु करण्यात यावे याबाबत मा.आदिवासी विकास मंत्री यांना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वसतिगृह क्षमता ७५ असल्याने आदिवासी विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, शहापूर येथील मंजूर विद्यार्थी क्षमता ७५ इतकी असली तरी विद्यार्थी प्रवेशापासून वंचीत राहू नयेत म्हणून सोलापूर व पेण प्रकल्पातील रिक्त असलेली एकूण १३९ क्षमता शहापूर प्रकल्पात समायोजनाने वर्ग केलेली आहे. सन २०१५-१६ मध्ये शहापूर वसतीगृहात १२५ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे.

-----------------

**आष्टी (जि.बीड) तालुक्यात विविध योजनेतील लाभार्थ्यांच्या नावात झालेल्या चुकांबाबत**

**(१३) * ४४९५६ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि.बीड) तालुक्यात श्रावण बाळ, संजय गांधी निराधार आणि इंदिरा गांधी भूमीहिन योजनेतील शेकडो लाभार्थ्यांच्या नावांमध्ये झालेल्या चुकांमुळे लाभार्थ्यांना नाहक त्रास होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ च्या अंतिम सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदरहू योजनेच्या लाभार्थ्यांच्या नावात झालेल्या चुका दुरुस्त करण्याबाबत शासनाकडून आतापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) आष्टी जि.बीड तालुक्यात माहे जानेवारी, २०१६ मध्ये विशेष सहाय्य योजनेच्या काही लाभार्थ्यांच्या आधार कार्डवरील व बँकेच्या पासबुकवरील नावात किंचितसा फरक निदर्शनास आल्याने काही बँकानी अनुदानाचे वाटप केले नव्हते.त्यास अनुसरून सदर बँकाना लाभार्थ्यांचे अनुदान वाटप करण्याबाबत तहसिलदार स्तरावरून निर्देशित केले आहे. तसेच आधार कार्डवरील नावाप्रमाणे खात्री करून नावे दुरूस्त करण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इस्लामपूर व शिराळा (जि.सांगली) येथील मुलांच्या वसतीगृहाकरिता करण्यात आलेल्या जागा खरेदीत झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत

**(१४) * ४८३३४ श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील इस्लामपूर व शिराळा येथील सामाजिक न्याय विभागांतर्गत मुलांच्या वसतिगृहाकरिता शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाची जमीन उपलब्ध असताना त्याऐवजी खाजगी जमीन खरेदी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इस्लामपूर येथील वसतिगृहाकरिता मौजे कापूसखेड येथील गट क्र. ८६३ वरील ९५ आर शासकीय जागा मंजूर करण्यात आली असताना व त्या जागेचा ताबा सार्वजनिक बांधकाम विभागास प्राप्त झाला असताना तसेच, शिराळा येथील वसतिगृहाकरिता प्रत्यक्षात एक एकर जमीन आवश्यक असताना ६९ आर खाजगी जमीन खरेदी करुन व त्या जमिनीचे मा.दुय्यम निबंधक, शिराळा यांनी रुपये ४८ लाख, ८४ हजार मुल्यांकन केले असताना त्याऐवजी सदर जमीन १ कोटी ८ लाख २२ हजार ८८२ रुपयांना खरेदी करुन शासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी आर्थिक गैरव्यवहार केला असल्याची बाब निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १५ जुलै, २०१५ रोजी लेखी निवेदन देवून या प्रकरणाची उच्च पदस्थ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्याकरिता व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याकरिता विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

## पुणे जिल्ह्यातील स्वच्छता व्यवसायातील कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती मिळाली नसल्याबाबत

**(१५) * ३९७४१ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर व जिल्ह्यातील स्वच्छता व्यवसायातील कामगारांची सुमारे दोन हजार पाचशे मुले शिष्यवृत्तीसाठी पात्र असतांना माहे मे, २०१३ पासून एकाही मुलास शिष्यवृत्ती मिळाली नसल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिष्यवृत्ती मिळण्यास विलंब लागल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच, शिष्यवृत्तीचे तातडीने वाटप करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

## देऊळगांवराजा (जि.बुलडाणा) कृषी उत्पन्न बाजार समितीने नियमबाहय विकास कामे केल्याबाबत

**(१६) * ४६३९८ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगांवराजा (जि.बुलडाणा) कृषी उत्पन्न बाजार समितीने भुसंपादन प्रक्रिया पूर्ण न करताच बनावट दस्तऐवज तयार करुन नियमबाहय विकास कामे करुन शासनाकडून कोटयावधी रुपयांचा निधी प्राप्त केल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. माहे जानेवारी, २०१६ मध्ये देऊळगांव राजा कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये नियमबाह्य विकास कामे केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. सध्या कामे सुरु असलेली जमिन न्यायालयात जमीन मालकाशी झालेल्या संमतीपत्रानुसार सद्यस्थितीत बाजार समितीच्या ताब्यात असून भूसंपादनाची नियमित प्रक्रिया सुरु आहे. रितसर कार्यवाही करुन कॉटन टेक्नॉलॉजी मिशन प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून रु. १.४१ कोटी एवढे अनुदान बाजार समितीस प्राप्त झालेले आहे. सदर जागेवर बाजार समितीने मुलभूत सुविधा निर्माण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) चौकशीअंती बाजार समितीमध्ये नियमबाह्य विकास कामे केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसमत येथील अंश व ठेव योजनेंतर्गत दुय्यम निबंधक कार्यालयाचे सुशोभिकरण व नुतनीकरणाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१७) * ४१३२५ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वसमत उपविभागाच्या वतीने वसमत येथे अंश व ठेव योजनेंतर्गत दुय्यम निबंधक कार्यालयाचे सुशोभिकरण व नुतनीकरण करण्याच्या नावावर सुमारे ८ लाखांचा गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी दोषींविरुध्द कारवाई करण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही. त्यामुळे दोषींवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बाळे-हत्तुर ते बोरामणी या हैद्राबादला जोडणा-या महामार्गाचे कामाला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१८) * ४६७८४ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील रस्त्यांची जडवाहतूकीमुळे प्रचंड दुरावस्था झाली असून रस्त्यांखालील जलवाहिन्या वारंवार फुटत आहेत, अपघाताच्या प्रमाणातही वाढ झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकारांना आळा घालण्यासाठी बाह्यवळणाचे काम करुन पुणे महामार्ग आणि विजापूर महामार्ग जोडणाऱ्या बाळे ते हत्तुर ते बोरामणी या हैद्राबादला जोडणाऱ्या महामार्गाचे काम त्वरीत करणे गरजेचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने त्याचा आराखडा तयार केला आहे, परंतु निधीअभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पाला मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सोलापूर शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ९ वरील कि. मी. २४१/००० ते २४२/००० ह्या लांबी दरम्यान जानेवारी, २०१६ मध्ये जुनी जलवाहिनी फुटल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे.

सोलापूर महानगरपालिकेकडून रस्त्याच्या क्षतिग्रस्त पृष्ठभागाची दुरुस्ती करुन रस्ता पूर्ववत करण्यात आला आहे. सदर रस्त्याची जडवाहतूकीमुळे दुरावस्था झालेली नाही.

(२) सोलापूर शहरातून जाणारी जड वाहतुक सुरळीत होण्याच्या दृष्टीने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणातर्फे NHDP Phase III अंतर्गत सोलापूर-विजापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. १३, कि. मी. ०/००० ते ११०/५४२ चे चौपदरीकरणाच्या प्रकल्पांतर्गत सोलापूर शहराच्या दक्षिण-पश्चिम बाजूस (South-West) बाळे ते हत्तुर हा २१/००३ कि.मी. इतक्या लांबीचा बाह्यवळण रस्ता मंजूर आहे.

हत्तुर ते बोरामणी या राष्ट्रीय महामार्ग क्र. १३ ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ९ यांना जोडणा-या प्रस्तावित बाह्यवळण रस्त्याचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या वतीने सन २०११ मध्ये प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले असुन अद्याप मंजुरी प्राप्त झालेली नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI), सोलापूर यांनी कळविले आहे.

(३), (४) व (५) हत्तुर ते बाळे ह्या २१.००३ कि. मी. बाह्यवळण रस्त्याचा काही भाग माळढोक अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातून जात असल्याने राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडून मंजुरी मिळण्यास विलंब झाल्याने बाह्यवळण रस्त्याच्या बांधकामासाठी नव्याने निविदा निश्चितीची कार्यवाही प्रगतीत असून निधी अभावी काम रखडलेले नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.

-----------------

## मुंबई-आग्रा महामार्गावरील सोनाळे ते कसारा, चिंतामणवाडी या महामार्गावर अपघाती मृत्यू होत असल्याबाबत

**(१९) * ४२८३८ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-आग्रा महामार्गावरील सोनाळे ते कसारा, चिंतामणवाडी या ७१ कि.मी. च्या अंतरामधील महामार्गावर गेल्या १० वर्षात ५१४ जणांचा अपघाती मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गाचे चौपदरीकरण झाल्यानंतरही अनेक ठिकाणी बायपास व अंडरपासची योग्य सुविधा नसल्याने याठिकाणी अपघातांचे सत्र अद्यापही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन याठिकाणचे अपघात रोखण्यासाठी कोणती तातडीची उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) अद्याप, याबाबत उपाययोजना करण्यात आली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ वरील सोनाळे ते कसारा सदरील अपघात साधारणपणे वेगाने वाहन चालविल्यामुळे, धोक्याच्या वळणामुळे तसेच रात्रीच्या वेळा वाहनांच्या प्रखर लाईटमुळे होत असल्याचे पोलीस अधिक्षक (मुख्यालय), अपर पोलीस महासंचालक, (वा.), मुंबई यांनी कळविले आहे.
(२), (३) व (४) भिवंडी बाह्यवळण रस्त्याच्या प्रस्तावित आठ पदरीकरणामध्ये सोनाळे ते वडपे या ७० कि.मी. च्या भागास पिसे, सोनाळे येथे वाहनांसाठी भुयारी मार्ग, वालसिंद येथे पादचारी भुयारी मार्ग आणि वडपे येथे उड्डाणपूल प्रस्तावित करण्यात आलेला आहे. भारतीय राष्ट्रीय राज्यमार्ग प्राधिकरणाकडे असलेल्या वडपे ते गोंदे या महामार्गावरील वडपे ते चिंतामणवाडी या ६४ कि.मी. भागात खडकी येथे वाहनांसाठी भुयारी मार्ग मंजूर करण्यात आला असून पाडघा-कल्याण फाटा (कि.मी. ५३२/४००), परिवार गार्डन (आसनगाव) व वासिंद (जिंदाल कं.) या तीन ठिकाणी वाहनांसाठी भुयारी मार्ग बांधण्याच्या कामास भारतीय राष्ट्रीय राज्यमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली येथील मुख्यालयाकडून तत्वत: मंजूरी देण्यात आली असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.

-----------------

## खिडकाळी पूल ते मानपाडा सर्कल (जि.ठाणे) येथे एलिव्हेटेड रस्ता तयार करण्याबाबत

**(२०) * ४११७१ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील कल्याण ग्रामीण विधान मतदार संघामध्ये कल्याण शीळ महामार्गावर वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी खिडकाळी पूल ते मानपाडा सर्कलपर्यंत एलिव्हेटेड रस्ता तयार करण्याकरिता स्थानिक लोकप्रतीनिधींनी दिनांक ०७ सप्टेंबर, २०१५ रोजी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर महामार्गावरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी कल्याण-शीळ हा चार पदरी असलेला रस्ता सहा पदरी करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रस्तावांसंदर्भात कोणता निर्णय घेण्यात आला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.

(३) व (४) भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्यावर साखळी क्र.०/०० ते २१/०० दरम्यान उपलब्ध लांबीत सहापदरीकरण व उर्वरित लांबीत उन्नत मार्ग बांधण्याच्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या प्रस्तावास अनुसरुन मंत्रीमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने दिनांक ३०.११.२०१५ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास अंमलबजावणी यंत्रणा म्हणून घोषित करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार नेमण्याची प्रक्रिया पार पाडली असून सहा महिन्यात सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येणार असून प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सुसाध्य होत असल्यास व प्रशासकीय मान्यता मिळाल्यावर निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्प हाती घेण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## राज्यातील महाविद्यालयांमधून बोगस प्रवेश दाखवून विद्यार्थ्यांच्या नावे जमा होणाऱ्या शिष्यवृत्तीत गैरव्यवहार केल्याबाबत

**(२१) * ३९७१९ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मॅट्रीकोत्तर अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था / महाविद्यालयांमधून बोगस प्रवेश दाखवून त्यांच्या नावे जमा होणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रक्कमेत

गेल्या ५-६ वर्षांत ५०० कोटी हून अधिक रूपयांचा गैरव्यवहार केल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जाती, ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करण्याचे आदेश सामाजिक न्याय विभागाने दिल्यानंतर गत वर्षीच्या तुलनेत २.६५ लाख मागासवर्गीय विद्यार्थ्यांची तसेच ३७३ महाविद्यालयांची संख्या घटल्याचे सुध्दा निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील शिष्यवृत्तीतील गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निदर्शनास आले आहे व त्याअनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) नाही.

सन २०१४-१५ मध्ये भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेतंर्गत दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यन्त १२०८४ महाविद्यालयातील १६५०३४२ विद्यार्थ्यानी शिष्यवृत्ती, शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती च्या लाभासाठी ऑनलाईन नोंदणी केलेली होती. सन २०१५-१६ मध्ये सद्यस्थितीत ११९०० महाविद्यालयातील १५,९९,७५० विद्यार्थ्यानी ऑनलाईन नोंदणी केलेली आहे.

सन २०१४-१५ मध्ये महाविद्यालय व अभ्यासक्रमांचे मॅपिग करण्यात आले आहे. सन २०१५-१६ मध्ये एकाच महाविद्यालयाचे दोन वेगवेगळया नावांनी असलेल्या नोंदणी पैकी एक रद्द करण्यात आल्यामुळे तसेच काही विद्यालयाचे संलग्नीकरण व मान्यता रद्द झाल्यामुळे महाविद्यालयांची संख्या कमी झाल्याचे दिसून येते.

सन २०१५-१६ पासून फक्त अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षासाठी विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज सादर करावयाचा असून अर्जाचे नुतनीकरण महाविद्यालय स्तरावरुन करण्यात येणार आहे. काही महाविद्यालयांनी अद्याप नुतनीकरण न केल्यामुळे विद्यार्थी संख्या कमी दिसून येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावरखेड (जि.अमरावती) येथील शेतकऱ्यांच्या शेतातून सोफिया प्रकल्पाला पाणी पुरविण्यासाठी पाईपलाईन टाकण्याबाबत

**(२२) * ४२५९३ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरखेड (जि.अमरावती) येथील महामार्गालगतच्या शेतकऱ्यांच्या शेतातून अप्परवर्धा धरणावरुन सोफिया प्रकल्पाला पाणी पुरविण्यासाठी पाईपलाईन टाकण्यात आली आहे, त्यामुळे बाधित शेतक-यांनी याची भरपाई इंडिया बुल्स कंपनीकडून मिळावी नाहीतर बाधित शेतक-यांना सामूहिक आत्महत्येची परवानगी व्हावी असे निवदेन जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाधित शेतक-यांना इंडिया बुल्स कंपनीकडून नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, सावरखेड येथील ग्रामस्थांनी दिनांक ११/०८/२०१५ रोजी याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी यांना सादर केले आहे.

(२) व (३) उप विभागीय अधिकारी, मोर्शी यांनी याप्रकरणी दिनांक ९/०२/२०१६ रोजी सदर प्रकरणी पिक नुकसानीबाबत कृषी विभागाचे मूल्यांकनाप्रमाणे नुकसान भरपाई अदा करण्याचे आदेश पारीत केले आहेत.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील आश्रमशाळा शिक्षकांचे वेतन थकीत असल्याबाबत

**(२३) * ४००४५ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील १०० आश्रमशाळांतील तब्बल अडीच हजार शिक्षकांचे वेतन मागील ५ महिन्यांपासून थकीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच या आश्रमशाळांना सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील फक्त १५ ते २०% देय अनुदान मिळाले असल्याने विद्यार्थ्यांना उपासमारी, शैक्षणिक साहित्य, दैनंदिन गरजा अशा अनेक असुविधांना सामोरे जावे लागत आहे असे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आश्रमशाळांतील शिक्षकांचे वेतन व देय अनुदाने मिळण्यासाठी व भविष्यात असा विलंब होणार नाही याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही. जानेवारी-२०१६ अखेर पर्यंत वेतन अदा करण्यात आलेले आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) सन २०१५-१६ मध्ये वेतनासाठी १००% अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. तसेच आश्रमशाळांचे महिन्याच्या एक तारखेला वेतन अदा करण्याचे आदेश दि. १८.१०.२०१२ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील आदिवासी विकास विभागाच्या वसतिगृहातील साहित्य विनावापर पडून असल्याबाबत**

**(२४) * ४७७४४ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाकडून यवतमाळ जिल्हयात ३० शासकीय आश्रमशाळा, ४० अनुदानित आश्रमशाळा व ३० वसतिगृह चालविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ जिल्हयातील पुसद तालुक्यातील हर्षी व यवतमाळ तालुक्यातील चिचघाट, किटा कापरा येथील आश्रमशाळेतील प्रांगणात जनरेटर, थ्रेषर चक्की, स्प्रे पंप, शिलाई मशिन पाईप आदी साहित्य मागील एक वर्षापासून पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर वसतिगृहातील अनेक खोल्यात व निवासाच्या खोलीतही सदर साहित्य पडून असल्यामुळे वातावरण पुर्णतः दुषित होऊन विद्यार्थीनींचे आरोग्य धोक्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर साहित्य गरजु लाभार्थ्यांना वेळेवर वाटप का केले नाही, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

स्प्रे पंप, शिलाई मशिन, चक्की व पाईपचे वाटप करण्यात आलेले आहे. तर थ्रेशर पुरवठा व जनरेटर पुरवठ्याबाबत चौकशी सुरु असल्याने थ्रेशरचे लाभार्थ्यांना वितरण करण्यात आलेले नाही व जनरेटर सेट कार्यान्वित केलेले नाहीत.

(३) हे खरे नाही.

(४) थ्रेशर पुरवठ्याबाबत पांढरकवडा पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल असुन प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. जनरेटर पुरवठ्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती यांच्याकडून चौकशी सुरु आहे.

-----------------

**राज्य सहकार परिषदेच्या सर्वेक्षणात बोगस सहकारी संस्था आढळून आल्याबाबत**

**(२५) * ४५२१३ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सहकार परिषदेने केलेल्या सर्वेक्षणात तब्बल ५४ हजार बोगस सहकारी संस्था आढळून आले असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य सहकार परिषदेचे सर्वेक्षण पुर्ण झाले आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालात आणखी किती संस्था बोगस आढळून आल्या आहेत,

(४) असल्यास, बोगस संस्थांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) राज्य सहकार परिषदेने सर्वेक्षण केलेले नाही. तथापि सहकार आयुक्त कार्यालयामार्फत सर्वेक्षण करण्यात आले आहे.

(२) सहकार आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात आलेले सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.

(३) व (४) सहकार परिषदेने सर्वेक्षण केलेले नाही. तथापि, सहकार आयुक्त कार्यालयास सर्वेक्षणापूर्वी व सर्वेक्षणात एकूण ५४११५ संस्था बंद/कार्यस्थगित/ठावठिकाणा नसलेल्या आढळून आल्या आहेत. त्यापैकी ७७४० एवढ्या संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. इतर संस्थांबाबत अवसायनाची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**घोडेगाव (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयामार्फत वॉटर प्युरीफायर व रेनवॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प बसविण्याबाबत**

**(२६) * ४३३८२ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी आश्रमशाळेमधील विद्यार्थ्यांसाठी वॉटर प्युरीफायर व रेनवॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प बसविण्याचे काम घोडेगाव (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयामार्फत सन २०११ मध्ये मंजूर झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या ठेकेदाराला सदरहू काम देण्यात आले होते, त्या ठेकेदाराने हे काम अद्याप पूर्ण केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विरोधात स्थानिक लोकप्रतिनिधींनी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी घोडेगांव (जि.पुणे) पोलीस ठाण्यात माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव यांनी प्रस्तुत प्रकरणी उज्वल आदिवासी सेवा संस्था, जळवंडी उसरान, ता. जुन्नर, जि. पुणे या संस्थेविरूध्द दि.१ जानेवारी, २०१६ रोजी घोडेगांव (ता.आंबेगाव, जि. पुणे) पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १/१६, भा.दं.वि. कलम ४२० अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी अपचारी संस्थेविरूध्द प्रकल्प अधिकारी, घोडेगांव (ता. आंबेगाव, जि. पुणे) यांनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केलेला असून फौजदारी कार्यवाही सुरू आहे.

-----------------

**राज्यात जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या पदनिर्मितीअभावी कार्यान्वित झालेल्या नसल्याबाबत**

**(२७) * ४०८०५ श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने जिल्हानिहाय ३६ जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या स्थापन करण्याचा निर्णय दिनांक २ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेवूनही पदनिर्मितीअभावी सदर समित्या अद्यापही कार्यान्वित झालेल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या अस्तित्वात असलेल्या १५ विभागीय जात पडताळणी समित्यांमधील १० अध्यक्ष, ५ उपायुक्त (सचिव) तर ३ सदस्य समित्यांची पदे रिक्त असल्यामुळे अनेक ठिकाणचे कामकाज रखडले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विविध ग्रामपंचायत, नगरपंचायत निवडणुका आणि शैक्षणिक कामकाजासाठी मोठ्या प्रमाणात जातवैधता प्रमाणपत्रासाठी जिल्हास्तरावर अर्ज आल्याने त्याचा निपटारा करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) दि. २.३.२०१५ च्या शासन निर्णयान्वये जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या स्थापन करण्यात आलेल्या असून, सदर समित्यांकरिता आवश्यक पदांची निर्मिती प्रस्तावित आहे.

(२) १५ विभागीय जात पडताळणी समित्यांवरील अध्यक्ष, उपायुक्त तथा सदस्य व संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव यांच्या रिक्त असलेल्या पदांचा अतिरीक्त कार्यभार कार्यरत अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला असून, सर्व समित्यांचे नियमित कामकाज सुरु आहे.

(३) विभागीय जात पडताळणी समित्यांकडे प्रलंबित असलेली व प्राप्त प्रकरणे विशेष मोहिमेद्वारे निकाली काढण्यासाठी समित्यांना सातत्याने निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे त्यांची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील रस्ते व पुल विशेष देखभाल दुरूस्ती योजनेत्तर प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत

**(२८) * ३९७९२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील रस्ते व पुल विशेष देखभाल दुरूस्ती योजनेत्तर कार्यक्रमातील गट फ या योजनेतंर्गत ब्रम्हपूरी, सावली, सिंदेवाही या तालूक्यातील १० कोटी ६९ लक्ष रूपयांच्या विविध विकास कामांचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर यांच्या वतीने मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांच्या मार्फत अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान पाठविलेला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देवून निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे लेखी निवेदन लोकप्रतिनिधीनी अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि सचिव, रस्ते यांना पत्र क्र. विव/ब्रम्ह/१०१०/२०१६ दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास शासनाने प्रशासकीय मान्यता देवून निधी उपलब्ध करून दिला आहे वा देण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) होय.
(३) चंद्रपूर जिल्ह्यासाठी सन २०१५-१६ या वर्षासाठी उपलब्ध होणारे गट ब, क व फ मधील कामासाठीचे अपेक्षित अनुदान रु. ११६४.२८ लक्ष इतके आहे. या वित्तीय वर्षासाठी रु. १०२९.३२ लक्ष रकमेचा दायित्वाचा व रु. ३६७४.०० लक्ष रकमेचा नवीन कामांचा गट ब, क व फ कार्यक्रम मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये ब्रम्हपुरी मतदार संघातील रु. २८४.०० लक्ष रकमेचा कामांचा समावेश आहे. तसेच रु. १२३०.०० लक्ष रकमेची कामे अर्थसंकल्पात मंजूर असून प्रगतीत आहेत.

जिल्ह्यासाठी मंजुर करण्यात आलेल्या कार्यक्रमाचा विचार करता या पेक्षा जास्त रकमेचा कार्यक्रम मंजुर करण्यासाठी वाव उपलब्ध नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोखाडा-जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील हमरस्त्यांची झालेली दुरावस्था

**(२९) * ४८९२१ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा-जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील हमरस्त्यांची खड्ड्यांमुळे अतिशय दुरावस्था झालेली असून सार्वजनिक बांधकाम विभागाने मातीने खड्डे बुजवल्याने सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डांबराने खड्डे बुजविण्याच्या प्रक्रियेत विलंब व दुर्लक्ष होत असल्याचे दिनांक ५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती चौकशी आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विलंब व दुर्लक्षित कारभारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

जव्हार व मोखाडा तालुक्यातील खराब झालेल्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे रस्ते दुरुस्ती गट-अ, सन २०१५-१६ मध्ये मंजूर केलेल्या कार्यक्रमातून माहे डिसेंबर-२०१५ मध्ये डांबर मिश्रित खडीने भरुन रस्ते वाहतूकीस सुरळीत केले आहेत.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वरळी येथील मागासवर्गीय वसतिगृहात विद्यार्थ्यांवर होत असलेल्या अन्यायाबाबत

**(३०) * ४०४७० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी येथे बीडीडी चाळ क्र.११८ येथे मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह असून तेथे राहणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रकल्प साहित्य व इतर लेखन सामुग्री मिळत नसून तेथील विद्यार्थ्यांचा मानसिक छळ होत असल्याची तक्रार येथील विद्यार्थ्यांनी सामाजिक न्याय विभागाचे सचिव यांचेकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वसतिगृहात वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रम वर्ष वाया गेलेल्या विद्यार्थ्यांना राहण्यास परवानगी देणे, अभ्यासक्रमाची पुरेशी पुस्तके नसणे, अभ्यासिका व ग्रंथालयाची सोय नसणे, संगणक बंद असणे, लाखो रुपये खर्च करुन बसवलेले सोलर हिटर बंद असणे, प्रकल्प साहित्य व अन्य लेखन सामुग्री विद्यार्थ्यांना न देणे आदि स्वरुपाच्या त्रुटीबाबत विद्यार्थ्यांनी समाज कल्याण आयुक्त यांना दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) सदरहु प्रकरणी अध्यक्ष, प्रहार विद्यार्थी संघटना, मुंबई यांचेकडून प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, मुंबई यांना दि. १५.१२.२०१५ रोजी निवेदन दिले आहे.

(३) व (४) उपरोक्त मुद्दा १ बाबत त्वरीत चौकशी करुन स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह अहवाल तात्काळ शासनास सादर करणेबाबत आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

उपरोक्त मुद्दा २ बाबत प्रादेशिक उपायुक्त, सामाजिक न्याय विभाग, मुंबई यांनी "विद्यार्थ्यांना देय असलेल्या सर्व सोयी-सुविधा पुरविल्या जातील याप्रमाणे कार्यवाही करणेबाबत तसेच वसतिगृहातील एकही विद्यार्थी सोयी-सुविधांपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याबाबत" सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई शहर यांना दि. १५.०१.२०१६ च्या पत्रान्वये सूचना दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा ते अहमदनगर या जिल्हामार्गावरील वडघुल ते गुंडेगाव या रस्त्याची झालेली दुरावस्था

**(३१) * ४०५३१ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा ते अहमदनगर या जिल्हामार्गावरील वडघुल ते गुंडेगाव या ७ किलोमीटर लांबीच्या रस्त्याची अतिशय दुरावस्था झाली असून तेथे अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या कामाचे सर्वेक्षण करण्यात आले असून १ कोटी ९९ लाख रुपयांचा प्रस्ताव तयार करुन माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावाला शासन कधी मंजूरी देणार आहे,

(४) असल्यास, या प्रस्तावास मंजूरी त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३), (४) व (५) होय.

प्रश्नाधीन रस्त्याचे काम मंजूरी व निधीच्या उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

-----------------

## अजिंठा व वेरुळ लेण्यांकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(३२) * ४२१६३ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जगप्रसिध्द अजिंठा व वेरुळ लेण्यांना दिलेल्या दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास चिनच्या उपराष्ट्रपतींनी भेटी दरम्यान अत्यंत खराब रस्त्याने जावे लागल्याने केंद्र सरकारच्या परराष्ट्र खात्याने या खराब रस्त्यांची

गंभीर दखल घेऊन राज्य सरकारकडे तक्रार केल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांनी माहे नोव्हेंबर, २०१५ वा त्या दरम्यान औरंगाबाद ते फर्दापूर या रस्त्याची पहाणी करुन माहे डिसेंबर, २०१५ मध्ये या रस्त्याचे सर्फेसिंग करण्याकरीता तातडीने ३० कोटी रुपये मंजूर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद ते अजिंठा लेणीपर्यंतच्या ९५ किमी रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम ३१ टक्के कमी दरात मंजुर करुन त्या रस्त्याचे भूमीपुजन करण्यात आले परंतु हे काम सुरु झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्या अनेक वर्षापासून औरंगाबाद ते अजिंठा लेण्यांकडे जाणा-या रस्त्याच्या कामांवर सन २०१३-१४ व २०१४-१५, २०१५-१६ या तीन आर्थिक वर्षात किती रुपये खर्च करण्यात आले व त्या अंतर्गत कोणकोणती कामे करण्यात आली,

(४) असल्यास, हा रस्ता जागतिक वारसा असलेल्या अजिंठा लेणी या पर्यटक स्थळाकडे जात असल्याने याचे काम प्रलंबित असल्याने पर्यटक व इतर नागरिकांची गैरसोय होत आहे हे लक्षात घेता शासन आवश्यक कार्यवाही करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

चीनचे मा.उपराष्ट्रपती यांनी अजिंठा लेणी दर्शन कार्यक्रमासाठी औरंगाबाद-अजिंठा रस्त्यावरुन केलेल्या प्रवासादरम्यान सदर रस्ता खड्डेमय व खराब असल्याचे निदर्शनास आलेबाबत केंद्र शासनाच्या परराष्ट्र खात्याने तक्रार केल्याबाबत या विभागास कोणतेही पत्र प्राप्त नाही. तथापि, सदर रस्ता पृष्ठभाग नूतनीकरणा अभावी खराब असल्याचे अंशत: खरे आहे.

(२) प्रश्नाधीन रस्त्याच्या डांबरीकरण व मजबूतीकरणाचे रुपये २४६८ लक्ष रकमेचे काम मंजूर आहे. या कामाचे कार्यारंभ आदेश दि. २७.१.२०१६ रोजी दिले असून काम प्रगतीत आहे.

(३) सन २०१३-१४ ते २०१५-१६ या तीन वर्षात औरंगाबाद अजिंठा रस्त्याच्या कामावर अर्थसंकल्प, १३ वा वित्त आयोग, देखभाल दुरुस्ती कार्यक्रम गट-अ,ब,क,ड,ई मधून रु. २४७८.१२ लक्ष इतका खर्च झाला आहे. यातून रस्ता रुंदीकरण, मजबूतीकरण, डांबरीकरण, अपघातप्रवण स्थळांची सुधारणा व इतर

किरकोळ दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.
(४) सध्या प्रश्नाधीन रस्त्याचे आवश्यक त्या ठिकाणी मजबुतीकरण व डांबरीकरण, नूतनीकरणाचे काम प्रगतीत आहे. रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिवली (ता.मावळ, जि.पुणे) येथील पुलाच्या दुरुस्तीबाबत**

**(३३) * ३९६९१ श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवली (ता.मावळ, जि.पुणे) येथील पुलाला मधोमध भगदाड पडल्याने हा पूल धोकादायक बनला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिवली, भडवली, काटेवाडी, आर्डव, येलघोल, धनगव्हाण या गावांसाठी अत्यंत जवळचा मार्ग म्हणून या पुलाचा वापर केला जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गेल्या दोन वर्षांपूर्वी या भागात अतिवृष्टी झाल्याने पवना धरणाच्या दरवाजातून पाणी सोडण्यात आले होते, त्यावेळी या पुलाची उंची कमी असल्याने पाण्याच्या प्रवाहाने पुल वाहून गेला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने हा पूल दुरुस्त केला परंतु त्याच ठिकाणी पुलाला मधोमध मोठे भगदाड पडले आहे त्यामुळे अपघात घडत आहे, तसेच या पुलाला दोन्ही बाजूने कठडे नसल्याने प्रवाशी जीव मुठीत धरून प्रवास करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या शिवली येथील पुलाची तातडीने दुरस्ती करणेबाबत शासन स्तरावर कोणत्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सदर पुल प्रजिमा क्र. १०५ वर असून रस्त्याची लांबी ३५.६ कि.मी. आहे. प्रश्नांकित पूल हा ३५ मीटर लांबीचा असून पूलासाठी ६ मी. लांबीचे ५ गाळे व उर्वरीत ५ मीटर लांबीत ६०० मी. व्यासाचे पाईप पाच ओळीत आहेत. पुल हा

सबमर्सिबल पध्दतीचा आहे. पुलाच्या आर.सी.सी.पाईप असलेल्या भागातील मातीभराव जानेवारी, २०१६ मध्ये खचल्यामुळे पुलाच्या पृष्ठभागावर खड्डा पडल्याचे निदर्शनास आले तथापि सदर खड्डा भरुन घेवून रस्ता सुस्थितीत ठेवलेला आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) सन २०१२-१३ मध्ये अतिवृष्टीमुळे सदर पुलाचा वाहून गेलेला भराव जिल्हा परिषदेकडून दुरुस्त करण्यात आला होता. सदर पूल जिल्हा परिषदेकडून सा.बां. विभागाकडे हस्तांतरित झालेला आहे. सदरील पुलाचे बांधकाम हे खुप जुने असून भरावाच्या ठिकाणी पाईप व हेड वॉलचे बांधकाम हे क्षतिग्रस्त झालेले आहे. पूलाचा रेलींगची सुविधा नसल्यामुळे गार्डस्टोन लावण्यात आलेले असून या पुलाच्या भरावामध्ये पडणारे खड्डे वेळोवेळी भरुन पूलाचा पृष्ठभाग सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. सदर पूलाची पुर्नबांधणी करण्याचे प्रस्तावाधिन असून निधी, निकष व प्राथम्यक्रमाने हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## दिंडोरी (जि.नाशिक) येथील मुलींच्या शासकीय वसतीगृहात अन्नातून झालेली विषबाधा

**(३४) * ४२९४० श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथील मुलींच्या शासकीय वसतीगृहात निकृष्ट अन्न देण्यात आल्यामुळे ३१ मुलींना विषबाधा झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथे अन्न पुरवठा करणाऱ्या ठेकेदारावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, दिंडोरी, जुने व नवीन येथील ९ विद्यार्थीनींना दिनांक २५.९.२०१५ रोजी उलट्या व जुलाबाचा त्रास झाल्याने जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे औषधोपचारासाठी दाखल करण्यात आले होते, ही बाब खरी आहे.
(२) उपरोक्त दोन्ही वसतीगृहातील ठेकेदारांचा भोजनठेका बंद करण्यात आला असून नवीन भोजनठेका सुरु करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद शहरातील निराधार व अत्यल्प उत्पन्न असलेल्या नागरिकांना संजय गांधी निराधार योजनेतून मिळणारे अनुदान बंद असल्याबाबत**

**(३५) * ४८९५५ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील निराधार व अत्यल्प उत्पन्न असलेल्या नागरिकांना शासनामार्फत संजय गांधी निराधार योजनेतून मिळणारे अनुदान सन २०११ पासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुदान बंद करण्याची कारणे काय आहेत तसेच सदर योजनेतील अनुदान सुरु करावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, संजय गांधी निराधार योजनेतील अनुदान सुरु करण्याबाबत शासनस्तरावरील कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.
संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत औरंगाबाद शहरातील पात्र लाभार्थ्यांचे अनुदान नियमित चालु आहे.
(२) होय.
यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दि.१० ऑक्टो, २०१५ रोजीच्या निवेदना अनुषंगाने जिल्हाधिकारी औरंगाबाद कार्यालयाच्या दि.०४ नोव्हें, २०१५ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थिती मा. लोकप्रतिनिधी यांना अवगत करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हसनाबाद (ता.भोकरदन, जि.जालना) येथील गिरजा नदीवरील पुलाच्या दुरुस्तीबाबत**

**(३६) * ४८४४५ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हसनाबाद (ता.भोकरदन, जि.जालना) येथील गिरजा नदीवरील पुलाचे संरक्षक कठडे तुटलेले असल्याने दोन दुचाकी चालक रात्रीच्यावेळी अंधारात पुलाखाली पडून गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक ३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑक्टोबर महिन्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या पावसामुळे सदरहू पुलाचे कठडे वाहून गेल्यानंतर सदर पुल वाहतूकीच्या दृष्टीने धोकादायक झाला असल्याची बाब स्थानिक ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वारंवार निदर्शनास आणुन देखील मागील चार महिन्यांमध्ये विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानूसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) प्रश्नाधीन पुलाचे संरक्षण कठडे तुटलेले असल्यामुळे कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्याची घटना दिनांक ३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या दरम्यान घडली असल्याची नोंद पोलीस स्टेशन हसनाबाद, यांच्या अभिलेखावर नसल्याचे सहायक पोलीस निरीक्षक, हसनाबाद, यांच्या अहवालावरुन दिसून येते.

(२) काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बुलढाणा जिल्हयातील खाजगी वसतीगृहांमध्ये काम करणा-या कर्मचाऱ्यांचे मानधन थकीत असल्याबाबत**

**(३७) * ४२०२३ श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा परिषद समाजकल्याण विभागांतर्गत चालविण्यात येत असलेल्या खाजगी वसतीगृहांमध्ये काम करणाऱ्या जिल्हयातील १२४ कर्मचाऱ्यांचे मागील पाच महिन्यांपासून मानधन थकीत आहे त्यामुळे या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) मानधन थकीत होते, हे अंशत: खरे आहे.

(२) सदर योजनेअंतर्गत चालू वर्षामध्ये अर्थसंकल्पित तरतुदीपैकी उर्वरित तरतूद तसेच डिसेंबर, २०१५ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीद्वारे मंजूर झालेला निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गडचिरोली जिल्हयातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३८) * ४८५५८ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील गडचिरोली, अहेरी व भामरागड या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पातील जवळपास ३६३ अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली हा आदिवासी जिल्हा असल्याने उक्त रिक्त पदांमुळे येथील आदिवासी समाज व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यावर विपरीत परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, किती कालावधीत उक्त रिक्त पदे भरण्यात येणार आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

गडचिरोली जिल्हयातील गडचिरोली, अहेरी व भामरागड या एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्पातील सर्व संवर्गात मंजूर असलेल्या एकूण १७६७ पदांपैकी १२८७ पदे भरलेली असून ४८० पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

गट- ब संवर्गातील रिक्त असलेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांकडे देण्यात आलेला असून शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडे कामाचे समांतर वाटप करण्यात आलेले आहे. तसेच आश्रमशाळेतील रिक्त असलेल्या शिक्षक संवर्गातील पदांवर मानधन तत्वावर शिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे आदिवासी समाज व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यावर विपरीत परिणाम होत नाही.

(३) गट- ब संवर्गातील सहायक प्रकल्प अधिकारी हे पद सरळसेवा व पदोन्नतीने भरण्याबाबत शासनस्तरावर तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कार्यवाही सुरु आहे. तसेच गट- क व गट- ड संवर्गातील पद भरतीबाबत अपर आयुक्त, नागपूर व संबंधित प्रकल्प अधिकारी यांच्यास्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी तंत्रनिकेतन महाविद्यालयांमध्ये शिष्यवृत्ती अंतर्गत केलेला गैरव्यवहार

**(३९) * ३९८८१ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अजय चौधरी**

**(शिवडी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी तंत्रनिकेतन महाविद्यालयामधील अनुसूचित जाती, ओबीसी, व्हिजेएनटी आणि एसबीसी या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना व आदिवासी विकास विभागातर्फे अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अंतर्गत निर्वाह भत्ता दिला जातो व शिक्षणशुल्क, परिक्षा शुल्क आणि इतर शुल्क या तिन्हीचा लाभ कॉलेज चालविणाऱ्या संस्थांना मिळतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील खाजगी तंत्रनिकेतन महाविद्यालयाने बोगस प्रवेश, कागदोपत्री नोंदणी, एकाच विद्यार्थ्यांचे दोन ठिकाणी प्रवेश तसेच सन २००९-१० ते २०१४-१५ या काळात ६ लाख ८८ हजार १९८ विद्यार्थ्यांना नामांकन देऊन प्रत्यक्षात प्रथम वर्षाच्या अंतिम परिक्षेला ४ लाख ७७ हजार ९३६ विद्यार्थी बसवून न बसलेल्या २ लाख १० हजार २६२ विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क आणि इतर शुल्क यामध्ये गेल्या ६ वर्षात ५०० कोटी रुपयांची लूट केल्याचे प्रकरण निदर्शनास आल्यानंतर शासनाने सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्याचे आदेशही दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व ज्या महाविद्यालयाने आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे त्या महाविद्यालयाच्या व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) शैक्षणिक वर्ष २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीमध्ये एकूण ७,६२,१४५ इतक्या विद्यार्थ्यांनी खाजगी महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला असून त्यांची नोंदणी केली आहे.

तसेच नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी एकूण ७,२८,२८० इतके विद्यार्थी हिवाळी परीक्षेस व ५,४४,९१४ इतके विद्यार्थी हिवाळी परीक्षेस व ५,४४,९१४ इतके विद्यार्थी उन्हाळी परीक्षेस बसले होते.

राज्यातील मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क योजनेत गैरव्यहार झाल आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी गृहविभागाच्या शासन निर्णय दिनांक १५/१/२०१६ अन्वये विशेष चौकशी पथकाची (टास्क फोर्स) स्थापना करण्यात आलेली आहे.

(३) शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्काबाबतच्या विविध तक्रारींच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या विशेष चौकशी पथकामार्फत (टास्क फोर्स) चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वरळी (मुंबई) येथील शासकीय निवासी इमारतींच्या दुरुस्तीचे काम निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(४०) * ४४४७३ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) येथील शासकीय निवासी इमारतींच्या दुरुस्तीचे काम निधीअभावी प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासकीय निवासी इमारतींच्या दुरुस्तींच्या कामांसाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) प्रश्नाधीन कामासाठी सन २०१५-१६ या वर्षात रु. ११२४.०० लक्ष इतका निधी उपलब्ध झाला आहे. विभागाकडे प्राप्त निधीतून शासकीय निवासी इमारतीची अत्यावश्यक स्वरुपाच्या देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येत आहेत.

-----------------

## मराठवाडयातील रस्त्यांची झालेली दुरावस्था

**(४१) * ४१६८९ श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील १५ हजार ५०० किमी रस्त्यांची खड्डयांमुळे दुरावस्था झाली असून या विभागातील सुमारे २२ हजार किमी रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहेत व त्यातील ७० टक्के रस्ते खड्डयांमुळे खराब झाल्याचा प्राथमिक अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांच्या डागडुजीसाठी २ हजार कोटी रूपयांचा निधी मिळावा म्हणून मुख्य अभियंता यांनी दिनांक ५ डिसेंबर, २०१५ रोजी सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना प्राथमिक अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर अहवालाच्या अनुषंगाने सदर रस्त्यांचे मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण लवकरात लवकर हाती घेवून रस्त्याचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

या प्रादेशिक विभागांतर्गत रस्त्यांची एकूण लांबी २०२८५ किमी एवढी आहे. यापैकी १२१९० किमी लांबीत खड्डे पडले होते. त्यापैकी ६८६६ किमी लांबीतील खड्डे बुजविण्यात आले आहेत. उर्वरित लांबीतील खड्डे भरण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) प्रश्नाधीन रस्त्यावरील खड्डे भरण्याच्या कामासाठी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद, यांनी दिनांक १२.१.२०१६ अन्वये रु. १७३ कोटी इतक्या रकमेची मागणी केली आहे.

(३) व (४) सद्य:स्थितीत रस्त्याच्या एकूण क्षतिग्रस्त लांबीपैकी ६२% लांबी खड्डे भरुन रस्ते सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.

-----------------

## महिरावणी (ता.जि.नाशिक) येथील महात्मा फुले बहुउद्देशीय संस्था संचलित अनुदानित आश्रमशाळा या संस्थेची मान्यता रद्द करण्याबाबत

**(४२) * ४६०९७ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले बहुउददेशीय संस्था संचलित अनुदानित आश्रमशाळा महिरावणी, (ता.जि.नाशिक) या संस्थेने शासनाच्या नियमांचे उल्लंघन केल्यामुळे व विद्यार्थ्यांना भौतिक सोयीसुविधा उपलब्ध नसल्याचे कारणास्तव या संस्थेची मान्यता रद्द करण्याची शिफारस दिनांक ३ ऑगस्ट, २०१३ रोजी अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संस्थेची मान्यता रद्द करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) तसेच या आश्रमशाळेत शिक्षक भरतीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून शासनाने या गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, उक्त प्रश्न भाग (२) व (३) बाबत शासनाने काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) या संस्थेची मान्यता रद्द करण्यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२), (३), (४) व (५) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक यांनी सदर शाळेच्या कर्मचारी भरती नियम उल्लंघन प्रकरणी चौकशी करणेकामी स्थापन केलेल्या समितीने उक्त आश्रमशाळेस दि. ५.७.२०१३ रोजी भेट देऊन भेटीचा अहवाल अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना दि. ३.८.२०१३ रोजी सादर केला. सदर अहवालानुसार संस्थेने जून्या कर्मचा-यांना सामावून न घेतल्याने शाळेची मान्यता रद्द करणेची शिफारस केली होती. तथापि संस्थेने जून्या कर्मचा-यांचे समायोजन करुन घेतल्याबाबत संस्थेने अपर आयुक्त, नाशिक यांना दि.२६.८.२०१३ रोजी कळविल्याने अपर आयुक्त नाशिक यांचकडून पुढील नियमभंग विषयक कार्यवाही करण्यात आलेली नाही.

मात्र सदर शाळेच्या कारभाराबाबत तसेच सोयीसुविधांबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने उपआयुक्त (शिक्षण) यांनी दि.१.१२.२०१५ रोजी सदर शाळेस भेट देऊन सादर केलेल्या चौकशी अहवालानुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी दिनांक १५.१२.२०१५ अन्वये संस्थेस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यानुषंगाने संस्थेने आयुक्त कार्यालयास खुलासा सादर केला आहे. सदर खुलाशाच्या अनुषंगाने विषयांकित शाळेची सुनावणी घेवून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच तक्रारीद्वारे उपस्थित केलेल्या अतिरिक्त मुद्यांच्या अनुषंगाने सदर मुद्यांबाबत चौकशी करणेसाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक यांचे स्तरावरुन चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

-----------------

**हिमायतनगर (जि.नांदेड) येथील शासकीय आदिवासी मुलांच्या वसतीगृहात मुलांसाठी बनविलेल्या अन्नात अळ्या आढळल्याबाबत**

**(४३) * ४४९७४ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिमायतनगर (जि.नांदेड) येथील शासकीय आदिवासी मुलांच्या वसतीगृहात सकाळच्या जेवणासाठी बनविलेल्या अन्नात अळ्या आढळल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहात १२२ विद्यार्थांच्या जेवणाची व्यवस्था करण्यासाठी किनवट तालुक्यातील माळबोरगाव येथील स्व.पंचफुलाबाई शिक्षण प्रसारक मंडळाला कंत्राटी तत्वावर ठेका देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, सदर वसतीगृहात घाणीचे साम्राज्य पसरलेले असून विद्यार्थ्यांना झोपण्यासाठी पलंग नसणे, बंद पंखे आणि दार तुटलेल्या बाथरुममुळे नामुष्की ओढवली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) प्रस्तुत वसतीगृहास संबंधित सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांनी माहे डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या भेटीदरम्यान बंद पंखे, अस्वच्छता इत्यादी त्रुटी आढळून आल्या होत्या. त्यानुषंगाने पलंग, पंखे, स्नानगृहे व शौचालये यांची दुरूस्ती करण्यात आलेली आहे. तसेच वसतीगृह व परिसराची नियमित स्वच्छता करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून संबंधित गृहपालांची एक वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे. तसेच भोजनपुरवठाधारकाच्या भोजनठेका देयकातून १० टक्के रक्कम कपात करण्यात आली आहे. तसेच माहे डिसेंबर, २०१५ मध्ये सदर ठेका बंद करण्यात आला असून इतर ठेकेदारास भोजनठेका देण्यात आला असून सद्यस्थितीत भोजनव्यवस्था सुरळीत चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भुसावळ तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सुरु असलेली कामे निधी अभावी बंद असल्याबाबत

**(४४) * ४०१०७ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे प्रशासकीय इमारत, ट्रॉमा सेंटर, ग्रामीण रुग्णालय इ. कामे सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामे निधी अभावी बंद असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने तातडीने निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्नाधीन ३ कामासाठी एकूण रु. १३५.२० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली असून कामे प्रगतीत आहेत. सदर कामे निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील बहुउद्देशीय ग्रामीण सहकारी संस्थेमार्फत संशयास्पद कर्जवाटप झाल्याबाबत**

**(४५) * ५००३० श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील दिवाळखोरीत गेलेल्या खेड तालुका बहुउद्देशीय ग्रामीण सहकारी संस्थेच्या सुमारे १ कोटी ७९ लाख ५५ हजार रूपयांच्या संशयास्पद कर्जवाटप प्रकरणी सहकार खात्याने सखोल चौकशीला सुरुवात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेच्या १ हजार ३१७ कर्जदारांना नोटिसा पाठवून आपले म्हणणे सादर करण्यासंदर्भात संस्थेच्या सचिवांमार्फत नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत मात्र ज्यांना नोटिसा दिल्या आहेत त्यांनी प्रत्यक्षात कर्जच घेतले नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे सभासदांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून संस्थेमार्फत संशयास्पद कर्जवाटप झाले असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच शासनाकडे सादर झालेल्या प्राथमिक तपास अहवालामध्ये कर्ज खात्यांमध्ये खाडाखोड झाल्याचे देखील चौकशीत स्पष्ट झाल्याने यात फार मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येत आहे, याची शासन चौकशी करणार आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत दोषी आढ्ळणाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

संस्थेच्या सन २००५ ते २००८ या कालावधीच्या फेरलेखापरिक्षणासाठी श्री. एस.व्ही.सासवडकर, ले.प.श्रे-१ (बलूतेदार) चिपळून यांची नियुक्ती करणेत आलेली आहे व फेरलेखापरिक्षणाचे कामकाज सुरु आहे.

(२) अंशतः खरे आहे. फेर लेखापरिक्षण सुरु असून दरम्यान कर्जवाटपाच्या रकमा निश्चित करणेसाठी सदर संस्थेचे सचिव यांनी संस्थेच्या कर्जदारांना कर्ज रकमा रुजवातीसाठी नोटीसा पाठविलेल्या आहेत. आतापर्यंत काही लोकांनी सदर कर्ज घेतल्याचे अमान्य केले आहे. रुजवातीचे शिल्लक कामकाज संपल्यानंतर कर्ज अमान्य करणाऱ्या सभासदांची संख्या व रक्कम निश्चित करण्यात येईल.

(३) संस्थेचे फेरलेखापरिक्षणासाठी लेखापरिक्षकांची नियुक्ती करणेत आलेली असून सदरचे तपासणीनंतर सदरील कर्जवाटप हे संशयास्पद आहे किंवा कसे हे स्पष्ट होईल.

(४) होय.

सदर संस्थेची जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी यांचेमार्फत प्राथमिक तपासणी करणेत आलेली असून सदरचे तपासणीमध्ये कर्जखात्यात खाडाखोड झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाबत फेरलेखापरिक्षणाद्वारे चौकशी करणेत येत आहे.

(५) फेरलेखापरिक्षणात दोषी आढळलेल्या व्यक्तीवर योग्य ती कार्यवाही करणेत येईल.

-----------------

**रत्नागिरी जिल्हयातील बाणकोट सागरी सेतुच्या बांधकामाबाबत**

**(४६) * ४३२८० श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी-रायगड जिल्हयाला जोडणाऱ्या बाणकोट सागरी सेतुचे बांधकाम संथगतीने सुरु असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीवर्धन जिल्हा रायगड व मंडणगड जिल्हा रत्नागिरी यांना जोडणा-या या सागरी सेतुची लांबी १,४०० मीटर आहे व त्यासाठी शासनाने रुपये २९० कोटी मंजूर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निधीची मंजूरी असून देखील बांधकाम करणा-या कंपनीकडून विलंब होत असल्यानेच हा सागरी पुल लवकर पुर्ण होत नसून प्रवाशांचा वेळ व इंधन वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सागरी सेतूच्या कामाची जबाबदारी कार्यकारी अभियंता महाड, जिल्हा रायगड यांचेकडून कार्यकारी अभियंता, कोकण भवन (ठाणे) या कार्यालयाकडे वर्ग केल्यामुळे त्यामध्ये दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरचा पुल वेळेत बांधून पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

पर्यावरण विषय परवानगीसाठी लागलेला विलंब, बांधकामासाठी आवश्यक असलेल्या वाळुची अनुपलब्धता व भूसंपादनासाठी असलेल्या अडचणी यामुळे कामास विलंब लागला आहे.

(४) नाही.

कार्यकारी अभियंता, ठाणे खाडी पूल विभाग क्र.१, कोकणभवन, नवी मुंबई यांच्याकडे केवळ खाडी पुलाचे काम असल्याने सदरील पूलाच्या कामाकडे पुर्णत: लक्ष देता येते.

(५) व (६) सद्य:स्थितीत कामाची गती वाढविणेत आली आहे. त्यामुळे माहे सप्टेंबर, २०१७ अखेर काम पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे.

-----------------

## नाकोडा (ता.कळवण, जि.नाशिक) येथील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाबाबत

**(४७) * ४४१०५ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाकोडा (ता.कळवण, जि.नाशिक) येथील आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण, सोयी सुविधांचा अभाव, वह्या, पुस्तके आणि संगणकाची कमतरता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे २०० विद्यार्थ्यांनी ४ कि.मी. पायी जाऊन आदिवासी प्रकल्प कार्यालयाच्या समोर दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी ठिय्या आंदोलन करून तसे निवेदन प्रकल्प अधिकाऱ्यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आश्रमशाळेची पहाणी आदिवासी प्रकल्प अधिकाऱ्यांनी केली आहे काय व सदर आश्रमशाळेत सुविधा व सोयी, शैक्षणिक साहित्य तसेच सकस जेवण देण्याबाबत आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) अद्याप कोणतीच दखल घेतली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकरण आश्रमशाळेबाबतचे नसून नाशिक जिल्ह्यातील कळवण येथील आदिवासी मुलांच्या शासकीय वसतीगृहाबाबतचे आहे. सदर वसतीगृहातील विद्यार्थ्यांना संगणकाचा पुरवठा वगळता इतर सर्व सोयी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) सदर वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी दिलेल्या निवेदनानंतर प्रकल्प अधिकारी, कळवण यांच्यामार्फत दि.१४.०१.२०१६ वसतीगृहाची पाहणी करून वसतीगृहातील सोयी सुविधा, शैक्षणिक साहित्य, सकस भोजन याबाबत आढावा घेऊन आवश्यक

ती कार्यवाही करण्यात आलेली आहे. भोजन पुरवठाधारकास भोजनाचा दर्जा सुधारण्याबाबत अंतीम नोटीस देण्यात आलेली असून भोजनामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्ह्यातील विशेषत: साक्री येथील शासकीय आदिवासी मुलींच्या वसतीगृहात अनेक सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(४८) * ४१५६१ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.काशिराम पावरा (शिरपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील विशेषत: साक्री येथील शासकीय आदिवासी मुलींच्या वसतीगृहात आदिवासी विभाग प्रकल्प धुळे मार्फत आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविण्यात येत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे वसतीगृहातील ४२ मुलींनी दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास कडाक्याची थंडी असतानाही विविध मागण्यांचे निवेदन देण्यासाठी नाशिक येथील दीडशे कि.मी. अंतरावर असलेल्या अप्पर आयुक्त आदिवासी कार्यालयावर मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदिवासी मुलींच्या वसतीगृहातील मुलींची पाणी, शौचालय, वीजपुरवठा इत्यादी सुविधाबाबतची बरीच जुनी मागणी असतांना याप्रकरणी संबंधित वॉर्ड व प्रकल्प अधिकारी, आदिवासी एकात्मिक विभाग, धुळे यांनी अक्षम्य दुर्लक्ष केले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

सदर वसतीगृहातील मुलींना विभागाच्या दि.१०.०४.२०१३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदींच्या अनुषंगाने गणवेश, खेळ साहित्य, शैक्षणिक साहित्य, स्पर्धा परिक्षा पुस्तके, इत्यादी सोयी सुविधा तसेच माहे फेब्रुवारी, २०१६ पर्यंतचा निर्वाह भत्ता प्रकल्प अधिकारी, धुळे यांच्यामार्फत पुरविण्यात आलेला आहे.

(२) आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, साक्री, जि.धुळे येथील विद्यार्थीनींनी साक्री येथे वसतीगृहासाठी भाडेतत्वावर घेतलेली इमारत निवासाच्या दृष्टीने योग्य नसल्याने सदर वसतीगृह स्थलांतरीत करण्याच्या प्रमुख मागणीसाठी वसतीगृहातील मुलींनी दि.२४.०१.२०१६ रोजी आदिवासी विकास भवन, नाशिक येथे आंदोलन केले होते.

(३) भाडेतत्वावर असलेल्या इमारतीमधील अपुऱ्या सोयी सुविधांच्या अनुषंगाने विद्यार्थीनींनी जानेवारी, २०१६ मध्ये आंदोलन केले होते. त्यास अनुसरून माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये सदर दोन्ही वसतीगृहे शासकीय इमारतीत स्थलांतरीत केलेली आहेत.

नवीन इमारतीत पुरेशी शौचालये व स्नानगृहे असून सुरळीत वीजपुरवठा तसेच पुरेसा पाणीपुरवठा सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रामपूर (ता.घाटंजी, जि. यवतमाळ) येथील शासकीय**
**आश्रमशाळा बंद असल्याबाबत**

**(४९) * ४६५३५ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामपूर (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील शासकीय आश्रमशाळा मागील २ महिन्यापासून बंद असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकीय आश्रमशाळेमध्ये शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी असे एकूण २७ कर्मचारी आहेत असे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) सदर आश्रमशाळा २ महिने बंद असल्याची कारणे कोणती व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करणा-यांवर कोणती ठोस कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

रामपूर (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) शासकीय आश्रमशाळेत एकूण २४ शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भूमिहीन शेत मजूरांना पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेंतर्गत जमिनीचे वाटप न केल्याबाबत

**(५०) * ४१६१० श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारिद्रयरेषेखालील अनुसूचित जाती व नवबौध्द व भूमिहीन शेत मजूरांना पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेंतर्गत चार एकर जमीन कोरडवाहू किंवा दोन एकर बागायती जमिनीचे वाटप केले जाते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहमदनगर जिल्हयात या योजनेंतर्गत सामाजिक न्याय विभागात गेल्या पाच वर्षापासून सुमारे २००० पेक्षा जास्त भूमिहीनांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) तसेच इतके प्रस्ताव प्रलंबित असण्याची कारणे कोणती व पुढे त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

तथापि, प्रस्तावांची संख्या ही ५४१ एवढी आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) शासकीय दराने (रेडीरेकनर) जमीन उपलब्ध होत नाही.

-----------------

**पुणे येथील समाज कल्याण आयुक्तालय कार्यालयाच्या भरती प्रक्रियेची चौकशी करण्याबाबत**

**(५१) * ४००२० श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील समाज कल्याण आयुक्तालय कार्यालयामार्फत सन २०१३ मध्ये वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक, शिपाई, अधिक्षक, निरीक्षक आदी विविध पदांच्या भरतीसाठी लेखी परिक्षा घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच अंतिम यादीमध्ये अनेक उमेदवारांच्या नावापुढे विविध कारणांमुळे अपात्र असा शेरा देण्यात आला परंतु सुधारित अंतिम यादी घोषित न करणे, तसेच अंतिम यादीत अपात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांच्या ऐवजी दुस-या कोणत्या उमेदवारांची निवड करण्यात आली याचीही माहिती जाहीर करण्यात आली नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिक्षेचा निकाल सन २०१५ मध्ये घोषित करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भरती प्रक्रियेतील अपात्र उमेदवारांकडून प्रत्येकी नऊ लाख रुपये घेण्यात आले, परंतु गुणवंत उमेदवार वंचित राहीले असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, समाज कल्याण विभागाने राबविलेल्या संपूर्ण भरती प्रकियेची चौकशी करण्यात आली काय, सदर चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) नाही.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ॲसिड हल्लाग्रस्तांना अपंग व्यक्तीप्रमाणे हक्क मिळणेबाबत**

**(५२) * ४०४३२ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ॲसिड ग्रस्त व्यक्तीना अपंग व्यक्तीप्रमाणे सर्व हक्क देण्याबाबतच्या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी राज्य शासन करीत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ॲसिड हल्ल्यातील ॲसिडग्रस्त व्यक्ती शासनाच्या विविध सोई सवलतीपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त विषयी यावर शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाय योजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) ॲसिड ग्रस्त व्यक्तीना अपंग व्यक्तीप्रमाणे सर्व हक्क देण्याबाबतच्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सामाजिक न्याय विभागास वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने दि.३०.१.२०१६ च्या टिप्पणीन्वये कळविलेले आहे. तथापि, अपंग अधिनियम, १९९५ या केंद्र शासनाच्या अधिनियमाची राज्यात सन १९९६ पासून जशीच्या तशी अंमलबजावणी करण्यात येत आहे. ॲसिडग्रस्त व्यक्तींना अपंग व्यक्तीप्रमाणे लाभ देणे ही बाब सर्वथा केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असल्याने या अनुषंगाने केंद्र शासनास विनंती करण्यात येत आहे.

(४) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आश्रमशाळांचा दर्जा खालावत असल्याने आश्रमशाळा खाजगी उद्योग समूहास चालविण्यास देण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(५३) * ४९९२६ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), अॅड.वारीस पठाण (भायखळा), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.राज पुरोहित (कुलाबा), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने आश्रमशाळेसंदर्भात नुकत्याच केलेल्या सर्वेक्षणात राज्यातील अनूसूचित जाती-जमातीमधील तीन लाखाहून अधिक विद्यार्थी आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेत असून, ठाणे, पालघर, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, जव्हार भागातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासह या शाळांनी त्यांच्या व्यक्तीमत्व विकासावर भर देणे ही अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना पुस्तकासह शैक्षणिक सुविधा, सामाजिक हक्क मिळावेत यासाठी १२०० कोटी रुपये निधीची तरतूद शासनाने केली आहे, परंतू हा निधी प्रत्यक्षात विद्यार्थ्यांपर्यंत पोहचत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे आश्रमशाळांचा दर्जा खालावत असल्याने सदरच्या आश्रमशाळांपैकी ५२९ आश्रमशाळा खाजगी उद्योग समूहास चालविण्यास देण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) शासनाने यासाठी कोणतेही सर्वेक्षण केलेले नाही. सध्या शासकिय आश्रमशाळांमध्ये १,९१,८१८ इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सर्वच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर भर देणे आवश्यक आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

तथापि, खाजगी उद्योगांनी त्यांच्या नफ्यापैकी काही भाग सामाजिक दायित्वअंतर्गत (CSR) खर्च करावा लागतो. सबब सदर उद्योगांनी आपला निधी शासकिय आश्रमशाळांमधील पायाभूत सुविधा; विद्यार्थ्यांच्या सुविधा; विद्यार्थी, शिक्षक व शाळा व्यवस्थापन समित्यांची क्षमतावृद्धी; कौशल्य व व्यवसाय प्रशिक्षण; शाळेतील स्वयंपाकगृहांचा दर्जावाढ; मानव संसाधन सहाय्य इ. बाबींवर खर्च करावा यासाठी उद्योजकांना उद्युक्त करण्यासाठी दि.३/१२/२०१५ रोजी उद्योजकांसोबत मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. काही उद्योगांनी सहकार्य करण्यास सहमती दर्शविली असून त्यांच्या सोबत चर्चा सुरु आहे.

-----------------

## मागासवर्गीय समाजाला जातीचा दाखला काढण्यात अडचणी येत असल्याबाबत

**(५४) * ४०१४४ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संपूर्ण महाराष्ट्रात मागासवर्गीय समाजाला जातीचा दाखला काढण्याकरीता जाचक अटी घातल्या असल्यामुळे जातीचा दाखला काढण्याकरीता समाजातील विद्यार्थांना तसेच नागरीकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे हे खरे आहे काय,

(२) अशा जाचक अटीमूळे अनेक विद्यार्थी तसेच नागरीकांना आरक्षणाचा लाभ घेता येत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा. मंत्री सामाजिक न्याय यांना भिम-छावा या संघटनेने निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्याच्या मागासवर्गीयांच्या यादीमध्ये ज्या जातींचा समावेश आहे, केवळ त्याच जातीतील समाजाच्या लोकांना मागासवर्गीयांचे जातप्रमाणपत्र देण्यात येते. मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश, तसेच सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ नुसार जातपडताळणी नियम २०१२ विहित करण्यात आले आहेत. या नियमांनुसार जातप्रमाणपत्र देणे व त्याच्या पडताळणीचे कामकाज चालते. जातपडताळणी नियम-२०१२ नुसार आवश्यक ती कागदपत्रे, पुरावे सादर केल्यास जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यास कोणतीही अडचण उद्भवत नाही.

(३) व (४) हे खरे आहे.

सदर निवेदनात जातीचा दाखला मिळण्याकरिता सन १९५० पूर्वी महाराष्ट्रात वास्तव्य असल्याबाबतची अट रद्द करण्याची मागणी करण्यात आलेली आहे. सदर अट शिथिल करण्याबाबत भारताचे अटर्नी जनरल यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्हयातून जाणा-या जालना ते वडीगोद्री राज्य महामार्गाच्या कामास मंजूरीबाबत

**(५५) * ५००८२ श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातून जाणा-या जालना ते वडीगोद्री राज्य महामार्गाच्या कामास मंजूरीसह निधी मिळून भूमिपूजन माहे जानेवारी २०१५ मध्ये करण्यात आले तरी कामास सुरुवात करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर रस्त्याचे चौपदरीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत  नाही.

(३) सदर रस्त्याची सुधारणा ॲन्युईटी तत्वावर हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत  नाही.

-----------------

**घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील बँक ऑफ महाराष्ट्राच्या कुंभारपिंपळगांव शाखेत पिककर्ज वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(५६) * ४७३१७ श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील पिंपरखेड येथील १०० व्यक्तींनी बनावट कागदपत्रे बँक ऑफ महाराष्ट्राच्या कुंभार पिंपळगाव शाखेत दाखल करुन १ कोटी १४ लाख रुपयाचे पीक कर्ज उचलल्या प्रकरणी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी तक्रार केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) याप्रकरणी बँकेमार्फत दि. १८/१२/२०१५ रोजी एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत  नाही.

-----------------

**कशेळी-अंजूरफाटा (ता.भिवंडी) या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(५७) * ४४६६७ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.संभाजी निलंगेकर-पाटील (निलंगा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कशेळी-अंजूरफाटा (ता.भिवंडी) या रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी मे. कल्याण संगम इन्फ्रास्ट्रक्चर लि.या खाजगी ठेकेदारांमार्फत टोलवसूली करण्यात येऊनही रस्त्यात मोठ्या प्रमाणावर खड्डे तसेच वाहतूक कोंडी होत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उडणाऱ्या धुळीमुळे तेथून ये-जा करणारे नागरिक, प्रवासी, वाहनचालक व वाहतुक शाखेच्या पोलीसांना मोठ्या प्रमाणावर आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्याने तेथील वाहतूक शाखेच्या पोलिसांनी श्रमदानातून रस्त्याची दुरुस्ती केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती न करणे, डिव्हायडरमध्ये एकही झाड न लावणे, यासंबंधातील अनेक तक्रारी स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी यांनी वारंवार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे करुनही विभागाचे अधिकारी संगनमत करुन व चुकीचा अहवाल शासनाला पाठवून रस्त्याची दुरुस्ती न करता टोलवसुली करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रस्त्याची दुरुस्ती न करता टोल वसूली करणाऱ्या मे.कल्याण संगम इन्फ्रास्ट्रक्चर लि.या कंपनीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले असून अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीत समावेश करुन आरक्षण देण्याबाबत

**(५८) * ४१८०३ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धनगर व हटकर ही जात आदिम जातीपैकी एक असून केंद्र शासनाकडील धनगड व धनगर केवळ “ड” व “र” या शब्दाच्या उच्चारामुळे राज्यातील धनगर या जातीस अनुसूचित जमातीच्या सवलतीपासून वंचित राहावे लागत असल्यामुळे राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीत समावेश करुन आरक्षण देण्यासाठी योग्य अहवाल केंद्र शासनाकडे पाठविला जावा तसेच इतर मागण्यांसाठी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धनगर समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात मुंबई येथील टाटा इन्सिटयुट ऑफ सोशल सायन्सेस या संस्थेमार्फत सुरु करण्यात आलेले संशोधन व सर्वेक्षणाचे काम पूर्ण झालेले आहे काय,

(३) असल्यास, याबाबतच्या अहवालाचे स्वरुप काय आहे,

(४) तसेच उक्त प्रश्न भाग (१) व (२) प्रकरणी शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) दिनांक १० जानेवारी २०१६ रोजीचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, दिनांक १०.२.२०१५ रोजी याच विषयासंदर्भात मा.लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(२), (३) व (४) नाही.

टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांचेकडून महाराष्ट्रातील धनगर ही भटकी जमात व "ओरॉन, धनगड" या अनुसूचित जमातीबाबत अभ्यासपूर्वक संशोधनाचे काम तीन टप्प्यात करण्यात येणार असून सध्या पहिल्या टप्प्यातील संशोधनाचे काम सुरु आहे.

टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांनी दिनांक १६.२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये पहिल्या टप्प्यातील फॉरमेटीव्ह संशोधनाच्या प्रगतीची माहिती तसेच प्रस्तावित मुख्य संशोधनांतर्गत भाग-एक व भाग-दोनच्या रुपरेषासंदर्भात शासनास प्रस्ताव सादर केला आहे. पहिल्या टप्प्याअंतर्गत विविध शासकीय कार्यालये, संस्था, शैक्षणिक संस्थांना भेटी देऊन प्राथमिक माहिती घेऊन तसेच धनगर समाजाबाबत साहित्य व पुस्तके प्राप्त करुन मुख्य संशोधनासाठी नियोजन केलेले आहे. दोन टप्प्यात होणारे मुख्य संशोधन पूर्ण करुन अंतिम अहवाल डिसेंबर २०१७ पर्यंत शासनास सादर करण्यात येईल असे टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## किनळे, कवठणी आणि सातार्डा (जि.सिंधुदुर्ग) गावाला जोडणारे तळवणे, वेळवेवाडी या महत्वाकांक्षी पुलाचे काम बंद असल्याबाबत

**(५९) * ४८१३७ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनळे, कवठणी, आणि सातार्डा (जि.सिंधुदुर्ग) गावाला जोडणारे तळवणे, वेळवेवाडी या महत्वाकांक्षी पुलाचे काम गेल्या दीड वर्षापासून बंद असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुलासाठी आवश्यक असणारी जागा संपादित करण्यापूर्वीच भूमिपुजनाचा कार्यक्रम करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कामाकरिता सुमारे ३ कोटी ५० लाख रुपयांचा आराखडा असताना जागा संपादित न करताच भूमिपूजन करण्यास घाई करण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त पुलाच्या कामास प्रत्यक्षात केव्हापर्यंत सुरुवात होण्याचे अपेक्षित आहे, सदर कामास विलंब होत असल्याने अंदाजपत्रकात देखील वाढ होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय, याकरीता शासन स्तरावर काय तरतूद करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) होय.
(३) भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना सादर केल्यानंतर भूसंपादन प्रक्रिया प्रगतीत असल्यामुळे भूमिपूजनाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला.
(४) व (५) पूलाच्या दोन्ही अंत्यपादांच्या विहिरींच्या पायाचे काम पूर्ण झाले. तथापि पूलाच्या बांधकामाकरीता आवश्यक जमीन ताब्यात न आल्याने सद्यस्थितीत काम बंद आहे. विलंबामुळे अंदाजपत्रकात वाढ झाल्यास नियमाप्रमाणे मंजुरी प्रदान करण्यात येईल.

-----------------

## राज्यातील आदिवासी विद्यार्थी स्वेटरपासून वंचित राहिल्याबाबत

**(६०) * ३९७६३ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.नरेंद्र पवार**

**(कल्याण पश्चिम), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे २ लाख आदिवासी विद्यार्थ्यांना मिळणारे स्वेटर राज्य शासन आणि ठेकेदारांमधील अंतर्गत वादामुळे मिळाले नसल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच नाशिक येथे आदिवासी विकास विभागाकडून विद्यार्थ्यांना देण्यात येणारे ३०० रुपयांचे स्वेटर थेट २१०० रुपयांना खरेदी करण्याची तयारी आदिवासी विभागाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत १ ली ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दर ३ वर्षांनी हिवाळयात स्वेटर देण्याचा राज्य शासनाचा मानस असतानाही केवळ ठेकेदारांनी घेतलेल्या आक्षेपामुळे सदर प्रक्रिया पूर्ण न झाल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रश्न भाग २ व ३ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने आदिवासी विद्यार्थ्यांना स्वेटरपासून वंचित ठेवणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे.

स्वेटर खरेदी प्रकरणात दराबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने खरेदी प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. तथापि शासन व ठेकेदारामध्ये अंतर्गत वाद उद्भवलेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) शासन निर्णय दि.४/३/२०१४ नूसार शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दर तीन वर्षातून एकदा वूलन स्वेटर देण्याची तरतूद आहे. त्यानुसार सन २०१५-१६ या शैक्षणिक सत्रात ई-निविदेद्वारे वुलन स्वेटर खरेदीची प्रक्रिया राबविण्यात आली. सदर निविदेतील दराबाबत तक्रारी प्राप्त झाल्यामुळे व तोपर्यंत हिवाळा संपला असल्याने खरेदी प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतींच्या दुरुस्तीबाबत

**(६१) * ४७१६४ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी इमारतीमधील धोकादायक घरांची दुरुस्ती सुरु असताना इमारत क्र. १ मधील सदनीकेतील स्वयंपाक घराचे छत कोसळून दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी दुर्घटना झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकिय कर्मचारी वसाहतीमधील सर्वच इमारती धोकादायक झालेल्या असून मलनिस्सारण व्यवस्था व सांडपाणी वाहून नेणाऱ्या वाहिन्या सडून गेल्या असल्याने परिसरात घाणीचे साम्राज्य व घरांच्या छताचे वारंवार प्लास्टर निखळून पडण्याच्या घटना याबाबत रहिवाश्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ जून, २०१५ रोजी सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना निवदेन देऊन इमारतींच्या दुरुस्तीची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व इमारतींमध्ये कायमस्वरुपी गळती प्रतिबंधक उपाययोजना, जमा झालेले पाणी पंपाद्वारे उचलण्याची व्यवस्था, मलनिःस्सारण व सांडपाणी वाहिन्यांचे नुतनीकरण करणे, पर्जन्य वाहिन्यांचे नव्याने बांधकाम करणे,

नादुरूस्त सदनीकांची अंतर्गत दुरुस्ती/नुतनीकरण करणे व कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करणे इत्यादी मागण्या करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागण्यांच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने आतापर्यंत काय उपाययोजना केली आहे व कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागण्यांचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(४) वांद्रे पूर्व येथील अत्यावश्यक असलेल्या वर्ग-४ व वर्ग-३ कर्मचाऱ्यांच्या इमारतींच्या सदनिकेमध्ये संरचनात्मक दुरुस्तीचे एकूण रु. ५७८.५० लक्ष रकमेच्या कामांच्या निविदा प्रक्रिया तात्काळ पूर्ण करुन सदर कामे तातडीने हाती घेण्यात येत आहेत. नियतव्ययाची मर्यादित उपलब्धता व वितरीत तरतुदीच्या अधीन राहून दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरातील पेठ रोडवरील इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य निवासी आश्रमशाळेतील असुविधांबाबत

**(६२) * ४४४०१ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.विजय औटी (पारनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील पेठ रोडवरील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या शेजारी असणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य निवासी आश्रमशाळेत इयत्ता ६ वी ते १२ वीच्या ३६० विद्यार्थ्यांना मुंढे गाव (इगतपूरी) येथील सेंट्रल किचन मधून देण्यात येणारे जेवण अत्यंत निकृष्ट पध्दतीचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या एकलव्य निवासी आश्रमशाळेत आंघोळीच्या गरम पाण्यासाठी असलेली सुविधा अनेक महिन्यांपासून बंद असल्याने विद्यार्थ्यांना थंड पाण्याने आंघोळ करावी लागल्याने अनेक विद्यार्थी थंडी-तापाने आजारी आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा अनेक गैरसोयी विरोधात विद्यार्थ्यांनी प्राचार्य, पोलीस व प्रकल्प अधिकारी यांचेकडे वारंवार तक्रारी केल्याची बाब दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्याअनुषंगाने संबंधीत प्राचार्य व प्रकल्प अधिकारी यांचेविरोधात तसेच आश्रमशाळेच्या कर्मचारी व संबंधीत जबाबदार अधिकाऱ्यांविरोधात शासनाने कारवाई करण्यात आली आहे काय, असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुल, पेठरोड, नाशिक येथे गरम पाण्याची सुविधा पुर्णत: कार्यान्वित आहे. तथापि नाशिक महानगरपालिका क्षेत्रात पाणी टंचाईमुळे पाणी कपात सुरु असल्याने काही वेळेस पुरेसे गरम पाणी आंघोळीसाठी मिळत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना क्वचित प्रसंगी थंड पाण्याने आंघोळ करावी लागते. परंतु त्याकारणाने अनेक विद्यार्थी थंडी-तापाने आजारी आहेत हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुल, पेठरोड, नाशिक येथील विद्यार्थ्यांना शासनाच्या मुंढेगाव ता. इगतपुरी जि. नाशिक येथील "अन्नपुर्णा" मध्यवर्ती स्वयंपाकगृहामधून होत असलेल्या भोजनाच्या मेनुप्रमाणे जेवण मिळावे अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली होती. इतर गैरसोयींबाबत विद्यार्थ्यांनी तक्रार केलेली नाही.

(४) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक यांनी विद्यार्थ्यांच्या तक्रारीची तात्काळ दखल घेवून संबंधित शाळेच्या निवडक विद्यार्थ्यांना "अन्नपुर्णा" या मध्यवर्ती स्वयंपाकगृहात भोजन कसे तयार केले जाते व त्याचा दर्जा कसा राखला जातो हे प्रत्यक्ष दाखविण्याच्या सुचना

प्राचार्यांना दिल्या होत्या त्यानुसार प्राचार्यांनी काही निवडक प्रातिनिधिक विद्यार्थ्यांना मध्यवर्ती स्वयंपाकगृह, मुंढेगाव येथे नेवून भोजन तयार करण्याची संपुर्ण प्रक्रिया दाखविली व पदार्थांच्या दर्जाबाबत त्यांच्या शंकांचे समाधान केले. तसेच मेनु प्रमाणे जेवण देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भाजीपाला फळे आणि कांदा, बटाटा यांना कृषी उत्पन्न बाजार समिती नियमनातून वगळण्याबाबत**

**(६३) * ४०२९५ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.छगन भुजबळ (येवला), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाजीपाला फळे आणि कांदा, बटाटा या शेतमालाला कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नियमनातून वगळण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधिन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा निर्णय घेतल्यास या वस्तू बाजारात न येता त्या थेट ग्राहकांच्या हातात जातील त्यामुळे बाजार समितीमध्ये माथाडी कामगार व इतर घटकांवर बेकारीचे संकट ओढवणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) या विरुध्द मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापारी, माथाडी कामगार व इतर घटकांनी दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी लाक्षणिक बंद पुकारण्याचा निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) नाही. कारण कोणताही नियमनमुक्त शेतमाल बाजार समितीच्या आवारात विक्रीसाठी आणण्यास मनाई नाही व असा शेतमाल बाजार समितीमध्ये आल्यास बाजार समिती उपविधीमध्ये तरतूद केल्यानुसार त्यावर सेवा शुल्क आकारु शकते. त्यामुळे बाजार समितीच्या उत्पन्नात लक्षणीय घट होण्याची शक्यता नाही.

(३) होय.

(४) शेतकऱ्यास त्याच्या मालाला जास्त भाव मिळावा ही शासनाची भूमिका आहे.

-----------------

## मानीव अभिहस्तांतरण प्रक्रिया सोपी करण्यासाठी तीन सदस्यीय समिती नेमणूक केल्याबाबत

**(६४) * ४७१८५ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री. मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री. दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री. अजित पवार (बारामती), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. राहुल मोटे (परांडा), श्री. वैभव पिचड (अकोले), श्री. संदिप नाईक (ऐरोली), डॉ. बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री. मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री. संजय केळकर (ठाणे), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री. विजय औटी (पारनेर), श्री. योगेश टिळेकर (हडपसर), श्री. सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बहुतांश गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या जागा व इमारत, मुळ मालकाच्या नावावर असून जमिनी सहकारी संस्थाच्या नावावर करण्यासाठी असणारी मानीव

अभिहस्तांतरण प्रक्रिया सोपी करण्यासाठी तीन सदस्यीय समिती दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांनी स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील ८५ हजाराहून अधिक सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या जागा अजूनही मूळ मालकाच्या नावावर आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) बांधकाम प्रकल्प मंजूर करतानाच सहकारी गृहरचना संस्थेचे नाव नोंद करुन ठेवावे व तत्काळ ७/१२ वर संस्थेचे नाव लावण्यात यावे अशा प्रकारची तरतूद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त नमूद त्रिसदस्यीय समितीने कोणते बदल सुचवले आहेत व त्याअनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१), (२), (३) व (४) मानीव अभिहस्तांतरण प्रक्रिया सोपी करण्यासाठी सहकार आयुक्तांच्या दिनांक २३.०७.२०१५ च्या आदेशान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालाचा अभ्यास करुन प्रधान सचिव (गृहनिर्माण) यांच्या समन्वयाखालील समितीने शासनास याबाबत शिफारशी कराव्यात, असे मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि. ०५.०१.२०१६ रोजी घेतलेल्या बैठकीत निर्देश दिले आहेत. सहकार आयुक्तांच्या आदेशान्वये गठीत समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

-----------------

## मुंबई-अहमदाबाद महामार्गावर दरड कोसळून वाहनांचे अपघात होत असल्याबाबत

**(६५) * ४५२४४ श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद महामार्गावर वसई, भालीवली, ढेकाळे, हलोली, दुर्वेस, चारोटी, तवा व महालक्ष्मी या भागात महामार्गावर दरड कोसळून वाहनांचे मोठ्या प्रमाणावर अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गाची देखभाल दुरुस्ती करणा-या ठेकेदार कंपनीच्या बेजबाबदारीमुळे तसेच प्राधिकरणामुळे वाहनांच्या अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकरणी शासनाने चौकशी वा पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने सदर बेजबाबदार ठेकेदार कंपनीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ च्या सहापदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत सुरु असून अशा प्रकारच्या कुठल्याही अपघाताची नोंद नसल्याचा अहवाल व्यवस्थापक (तांत्रिक), भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, मनोर यांनी कळविले आहे. तसेच वसई, भालीवली, ढेकाळे, हलोली, दुर्वेस, चारोटी, तवा, महालक्ष्मी या भागात महामार्गावर दरड कोसळून अपघात घडल्याच्या घटना घडलेल्या नसल्याचे पोलीस अधीक्षक (मुख्यालय), अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली-बारामती राज्य मार्गावरील विटा (ता.खानापूर, जि.सांगली) येथे धोकादायक वळण असल्याबाबत

**(६६) * ४५३२८ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली-बारामती राज्य मार्गावरील विटा (ता.खानापूर, जि.सांगली) येथे धोकादायक वळण असून समोर येणारी वाहने दिसत नसल्याने

दिनांक २४ डिसेंबर, २०१५ रोजीच्या सुमारास तीन मुलींचा अपघात होऊन मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, या रस्त्यावरील धोकादायक वळण काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, सदर वळणाचे काम केव्हापर्यंत करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रश्नाधीन वळण हे अहमदनगर-सांगली राज्य मार्ग क्र.६० वर विटा शहरालगत कि.मी. १४६/००- १४६/३०० मध्ये असून सदर ठिकाणी वहान मार्गाची रुंदी १० ते १२ मीटर आहे. सदर ठिकाणी अपघात टाळण्यासाठी विभागाकडून वळणावरील वाहन दिसण्यास अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करणे, वाहन मार्गावर पार्किंग पट्टे मारणे तसेच थर्मो प्लास्टीक पेंटचा वापर करुन वळणदर्शक फलक लावण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तथापि सदर वळणसुधारणा मानकानुसार करण्याचे सद्यस्थितीत प्रस्तावाधिन असून निधी, निकष व प्राथम्यक्रमाने हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र.४ कळंबोली ते शिळफाटा पर्यंतच्या रस्त्यावरील अनधिकृत बांधकामांबाबत

**(६७) * ४०८२१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल तालूक्यातील राष्ट्रीय महामार्ग कळंबोली ते शिळफाटा पर्यंतच्या रस्त्यावर वारंवार अपघाताला कारणीभूत ठरलेल्या मोठ्याप्रमाणातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी

माहे जानेवारी २०१६ रोजी वा त्यादरम्यान मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास प्राधिकरण, मुंबई यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभागामार्फत कोणत्याच प्रकारची ठोस कार्यवाही होत नसल्यामुळे अनधिकृत बांधकामे वाढतच आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भविष्यात रस्ता रुंदीकरणाच्या कामात वाढत चाललेली अनधिकृत बांधकामे अडचणीची ठरणार आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर अनधिकृत बांधकामांवर तातडीने कारवाई करण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) व (३) हे खरे नाही. कळंबोली ते शिळाफाटा दरम्यानची १९० अतिक्रमणे काढण्यात आली असून उर्वरित अतिक्रमणे काढण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. मुंबई-पुणे रा.म.४ या रस्त्यावरील अनधिकृत बांधकाम काढण्याची कारवाई महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सातत्याने करण्यात येत आहे व अतिक्रमणे वाढू नयेत यासाठीच्या आवश्यक उपाययोजनाही करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत विशेषत: नांदेड व अकोला शहरात वसतिगृहात मुलभूत सुविधा पुरविण्यात येत नसल्याबाबत

**(६८) * ४२७५१ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत विशेषत: नांदेड व अकोला शहरात मुलांचे व मुलींचे वसतिगृह कार्यान्वित असून या वसतिगृहात कोणत्याही

प्रकारच्या मुलभूत सुविधा राबविण्यात येत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, टिळक मार्ग, अकोला येथे गणपतीनगरामध्ये आदिवासी मुलांचे वसतिगृह असून या वसतिगृहात १०० पेक्षा जास्त विद्यार्थी वास्तव्यास असून यामध्ये इयत्ता ११ वी पासून एमबीबीएसपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(३) सदरहू जिल्हयांतील वसतिगृहात विद्यार्थ्यांना प्यायला शुध्द पाणी नसणे, दोन वेळचे चांगले जेवण उपलब्ध नसणे, स्पर्धा परिक्षा वर्ग, टायपींग, टॅली, डीटीपी, इन्सट्रक्टर आदि सुविधा नसणे, थंडी असतानाही ब्लॅकेट नसणे, अंथरायला बेडशीट नसणे, स्वच्छतेचा अभाव अशा अनेक अडचणींमुळे विद्यार्थी त्रस्त असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास याबाबत वरिष्ठांकडे अनेकवेळा मागणी केली असूनही त्यांची दखल घेण्यात आली नसल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(५) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) नांदेड जिल्हयात आदिवासी मुला-मुलींसाठी एकूण १५ शासकीय वसतीगृहे कार्यरत असून वसतीगृहांची क्षमता वाढवून देणे तसेच इतर अनुषंगिक मागण्यांसाठी वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये धरणे आंदोलन केले होते. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार वसतीगृह क्षमता वर्ग करून देण्यात आलेली असून प्रकल्प कार्यालयामार्फत स्पर्धा परिक्षा वर्ग, टायपिंग, टॅली, डीटीपी इत्यादी प्रशिक्षणाकरिता पात्र संस्थांची पहाणी करण्यात आलेली असून त्याबाबत कार्यवाही सुरू आहे. वसतीगृहातील स्वच्छतेकरिता डिसेंबर, २०१५ पासून बाहयस्त्रोताद्वारे प्रत्येक वसतीगृहाकरिता १ सफाईगार व ३ पहारेकरी कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता, गणवेश, सहलीचे पैसे इत्यादी भत्ते नियमित देण्यात येत आहेत.

अकोला जिल्हयात आदिवासी मुला-मुलींसाठी एकूण ६ शासकीय वसतीगृहे कार्यरत असून सदर वसतीगृहांमध्ये शैक्षणिक साहित्य, बेडींग साहित्य, क्रीडा

साहित्य, स्पर्धा परिक्षा पुस्तके इत्यादींचे वाटप करण्यात आले आहे. तसेच अकोला जिल्ह्यातील वसतीगृहांमध्ये वॉटर प्युरीफायरची सुविधा उपलब्ध असून वसतीगृह तसेच परिसराची नियमित स्वच्छता करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शिरुर ते वाघोली या दरम्यान साईडपट्टीवर ऑप्टीकल फायबर केबल टाकल्याबाबत**

**(६९) * ४२७९० श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-अहमदनगर रस्त्याच्याकडेने (रामा६०) शिरुर ते वाघोली या दरम्यान ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यासाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांनी एल अॅन्ड टी कंन्स्ट्रक्शन या कंपनीस काम दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याच्या कडेने १३ मीटरच्या पुढे केबल टाकण्यात यावी अशा सुचना असतांनाही शिरुर ते वाघोली या दरम्यान पुर्णपणे ९ ते १० मीटर साईडपट्टीवर ही केबल टाकण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास दिनांक ३ ऑक्टोबर, २०१५, २६ नोव्हेंबर, २०१५ व २८ डिसेंबर, २०१५ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी या कामाची तातडीने चौकशी करुन माहीती द्यावी अशी मागणी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांच्याकडे करुनही कोणतीही माहिती देण्यात आली नाही हे खरे आहे काय,

(४) असल्यास, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांनी एल अॅन्ड टी या कंपनीशी संगनमत करुन साईड पट्टीवर परवानगी नसतांना केबल टाकून साईड पट्टी खराब केली, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, पुणे शिरुर रस्त्यावरील वाहतुक कोंडी संपवण्यासाठी रुंदीकरण करणे गरजेचे असताना साईडपट्टीवर केबल टाकल्यामुळे काम करता येत नसल्याने ती केबल तातडीने काढुन घेण्याचे आश्वासन कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत दिनांक २८ डिसेंबर, २०१५ रोजी देऊनही कोणतीच कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**घराडी (ता. मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील स्नेहज्योती अंध विद्यालयाला अनुदान देण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(७०) * ३९९०१ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घराडी (ता. मंडणगड,जि.रत्नागिरी) येथे कोकणातील एकमेव स्नेहज्योती अंध विद्यालय गत १३ वर्षांपासून कार्यरत असून सदयस्थितीत ४४ मुले शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळेतील शिक्षक व अन्य कर्मचारी अत्यंत तुटपुंज्या मानधनावर काम करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शाळेला अनुदान मिळावे म्हणून विदयालयाने सन २०१३ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे प्रस्ताव पाठविला असून वारंवार पाठपुरावा करूनही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर विदयालयास अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२), (३) व (४) सदर शाळा ही कायम स्वरुपी विना अनुदान तत्वावर अनुज्ञप्ती प्राप्त असून, सदर संस्थेने अनुज्ञप्ती प्रमाणपत्र घेताना भविष्यात शासनाकडून

कोणतेही अनुदान मागणार नाही असे हमीपत्र दिलेले आहे. तसेच कायम स्वरुपी विना अनुदान तत्वावरील शाळांना अनुदान देण्याबाबत शासनाचे कोणतेही धोरण नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वणी ते करंजी (जि. यवतमाळ) रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत**

**(७१) * ४८११४ श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी ते करंजी (जि. यवतमाळ) रस्ता रुंदीकरणासाठी लालपुलिया परिसरात दोन्ही बाजूने चार ते पाच फुट खोदकाम करण्यात आल्याने ह्या ठिकाणी वाहनधारकांना व प्रवाशांना प्रवास करताना अत्यंत धोका असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाच वर्षापासून या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम संथगतीने सुरु असून येथे सायंकाळी प्रवास करताना वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदरहू रस्त्यावर दररोज प्रचंड वाहनांची वर्दळ असून परिसरात कोळसा डेपो असल्यामुळे वाहने तेथे उभी असल्याने वाहतुक अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हा रस्ता तातडीने पूर्ण करण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

काम प्रगतीत असल्याने आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या असून एप्रिल २०१६ अखेर पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) नाही.

(३) होय.

(४) कामाची गती न राखल्याने उद्योजकास प्रती दिवस रु. ५१,९००/- नुकसान भरपाई आकारण्यात आलेली असून एप्रिल २०१६ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

**राळेगांव (जि. यवतमाळ) येथील महिला पतसंस्थेमध्ये झालेल्या गैरप्रकाराबाबत**

**(७२) * ४५७१७ प्रा.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला ग्रामिण पतसंस्था, राळेगांव (जि.यवतमाळ) येथील संस्थेने ठेविदाराचे पैसे परत न करता लाखो रुपयांचा गैरप्रकार केल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राळेगांव येथील महिला पतसंस्थेत ठेवीदारांच्या रु. २ कोटी ५० लाखाच्या ठेवी होत्या त्या ठेवी त्वरीत परत न केल्यामुळे ठेवीदारांनी तहसिल कार्यालयासमोर उपोषण केले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पतसंस्थेच्या अधिका-यांनी ठेवीदारांच्या ठेवी परत न केल्यामुळे त्यांच्यावर  कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, तसेच ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे

(२) होय, खरे आहे.

ठेवीदारांनी दि. ०५.०१.२०१६ रोजी तहसिल कार्यालय राळेगांव येथे उपोषण केले होते.

(३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये पतसंस्थेच्या संचालक व पदाधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड किल्ल्याच्या रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीबाबत

**(७३) * ४०३४७ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड किल्ल्याच्या रस्त्यावर पडलेल्या असंख्य खड्डयामुळे या मार्गावरील महत्वाचे पूल व मो-या यांची कित्येक वर्षात देखभाल व दुरुस्ती करण्यात न आल्याने हा रस्ता अत्यंत दयनीय अवस्थेत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मार्गालगत असलेल्या नातेखिंडए-नाते (काळोसे इगाटा)-पाचाड या मार्गावर अतिक्रमण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मार्गाची तातडीने दुरुस्ती करण्यांसदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) होय.

(३) होय. सदर रस्त्याचे कि.मी. ०/८०० व ८/००० या ठिकाणी रस्त्याच्या कडेला काही प्रमाणात अतिक्रमण झाले असून या प्रकरणी संबंधितांना नोटीस देण्यात आली आहे.

(४) सदर रस्त्याचे डांबरी पृष्ठभागाने नुतनीकरण रस्त्यावर पडलेले खड्डे डांबरीकरणाने भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धारणी (जि.अमरावती) येथील तत्कालीन प्रकल्प अधिकारी यांनी योजनांचा निधी विकास योजनांवर खर्च केला नसल्याबाबत

**(७४) * ५०२३३ डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास विभाग, धारणी (जि.अमरावती) येथील तत्कालीन प्रकल्प अधिकारी श्री.रमेश मोवाशी यांनी आदिवासी विकास

विभागाच्या ठक्कर बाप्पा योजनेचा तसेच पारधी घरकुल योजनेचा सुमारे ७.६४ कोटी रुपयांचा निधी विकास योजनांवर खर्च केला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी अखर्चित राहील्याने हा ७.६४ कोटी रुपयांचा निधी या अधिका-यांने शासनास परत केला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी विभागात विकास कामे सुरु असताना या अधिका-यांने परस्पर हा निधी अखर्चित दाखवून शासनास परत केल्याने आदिवासी विकासाचे प्रकल्प प्रलंबित राहिल्याची तक्रार सदर लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री, आदिवासी विकास विभाग यांचेकडे दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी दोषी अधिका-यांवर काय कारवाई करण्यात आली आहे, तसेच शासनाकडे परत करण्यात आलेला निधी आदिवासी विकास योजनांच्या पुर्ततेसाठी पुन्हा उपलब्ध करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही.

i) ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत सन २०१५-१६ करीता प्रकल्प अधिकारी धारणी करीता रुपये ६५०.०० लक्ष तरतूद उपलब्ध केलेली आहे.

ii) पारधी विकास कार्यक्रमासाठी सन २०१५-१६ करीता प्रकल्प अधिकारी धारणी प्रकल्पाकरीता रुपये २०८.९५ लक्ष तरतूद उपलब्ध केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धुळे जिल्ह्यातील सोनगीर-दोंडाईचा-शहादा या रस्त्याच्या चौपदरीकरणाबाबत**

**(७५) * ४५१४० श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील सोनगीर-दोंडाईचा-शहादा या प्र.जि.मा. १ या रस्त्यावर सातत्याने अपघात होत असल्यामुळे सदरील रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्त्यावर मागील वर्षभरात अपघातांची संख्या वाढली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्याच्या प्रस्तावाला विशेष बाब म्हणून चौपदरीकरणासाठी मंजुरी देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) पोलीस विभागाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार अपघातांच्या संख्येमध्ये अल्प प्रमाणात वाढ झाली आहे.

(३) सदर रस्त्याची सुधारणा ॲन्युईटी तत्वावर हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर शहरातील टोल शासनाने बंद करण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(७६) * ४१०२३ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील टोल शासनाने आयआरबी कंपनीला रु.४६१ कोटी रस्ते प्रकल्पाच्या खर्चाची भरपाई देऊन बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयआरबी कंपनीने केलेल्या सदर रस्ते विकास प्रकल्पाची किंमत शासनाच्या मुल्यांकन समितीने निश्चित केलेल्या दरापेक्षा रु. ६४ कोटी जास्त आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच आयआरबी कंपनीने केलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाची दखल न घेता शासन पैसे देणार आहे काय, असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले ,

(४) असल्यास, याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) कोल्हापूर शहरातील पथकर नाके बंद करुन पथकर रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. पथकर नाके बंद केल्याने उद्योजकास द्यावयाच्या भरपाईची रक्कम अद्याप निश्चित झालेली नाही.

(३), (४) व (५) शासनाने नेमलेल्या विविध समित्यांनी निश्चीत केलेली नुकसान भरपाईची रक्कम, सदर रक्कम अदा करण्याची पध्दत या बाबत अभ्यास करुन नुकसान भरपाईची रक्कम अंतिम करुन याबाबतच्या शिफारसी शासनास करण्यासाठी नियोजन विभाग, वित्त विभाग, विधी व न्याय विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व नगर विकास विभागाच्या सचिवांनी एक समिती नेमण्यात येत आहे.

-----------------

## राज्यात आदिवासी आश्रमशाळांतील असुविधांबाबत

**(७७) * ४५७८९ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी आश्रमशाळा आणि सरकारी वसतीगृहांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या सोयी-सुविधा आणि प्रकल्पातून राबवल्या जाणा-या विविध योजनांच्या समस्यांवर आदिवासी आणि विदयार्थी कृती समितीने डहाणू तहसीलदार कार्यालयांवर मोर्चा काढला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विद्यार्थी संघटनेने मोर्चा काढून मा.तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनावर निर्णय घेवून शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार डहाणू प्रकल्पातील वसतीगृह प्रवेश क्षमता ५० ने वाढवून १५० करण्यात आली आहे. नवीन वसतीगृहे सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना प्रकल्प अधिका-यांना देण्यात आलेल्या आहेत. मुला-मुलींचे वसतीगृह कासा, ता. डहाणू, जि. पालघर साठी नवीन इमारत शोधण्याची कार्यवाही सुरु आहे. वसतीगृहांतील विद्यार्थ्यांना शासन निर्णय दि.११/११/२०११ नुसार सुविधा देण्यात आल्या आहेत. शासकिय आश्रमशाळांत पुरेसे शौचालये व स्नान गृह बांधण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रके प्राप्त करुन जिल्हा नियोजन समितीकडे मान्यतेस्तव सादर करण्यात आली आहेत. त्यापैकी ७ कामांना मान्यता मिळाली आहे. तसेच शाळा व्यवस्थापन समित्यांची स्थापना करून प्रत्येकी रु.१.०० लक्ष निधी आश्रमशाळा दुरूस्तीसाठी देण्यात आला आहे. आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी करुन घेण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या इतर मागण्याबाबत चौकशी करण्यासाठी सहायक प्रकल्प अधिकारी (विकास), एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू यांची नेमणूक करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे, पालघर आणि नवी मुंबई या पट्टयात पाच ठिकाणी नवे औद्योगिक केंद्र विकसीत करण्याबाबत

**(७८) * ४७०८५ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्राधिकरणाने ठाणे पालघर आणि नवी मुंबई या पट्टयात पाच ठिकाणी नवे औद्योगिक केंद्र विकसीत करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारपुढे सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी सादर केलेल्या प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) तसेच ठाणे, पालघर आणि नवी मुंबई या भागात रोजगार वाढीसाठी तसेच इतर सुविधांच्या विकासासाठी सदर प्रकरणी लवकारात लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपूरावा केला वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत, ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**तुमसर (जि.भंडारा) येथील बायपास रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत**

**(७९) * ४७५३८ श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (जि.भंडारा) येथील बायपास रस्त्याचे काम मंजूर असून शासनाने निधी उपलब्ध करुन काम त्वरीत सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (तुमसर) यांनी माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आणून दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

तथापि लेखी निवेदन प्राप्त झालेले दिसून येत नाही.

(२) बायपास रस्त्याकरिता भुसंपादनाचे काम प्रगती पथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाचल जवळेथर (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) रस्त्यावरील अर्जुना पुल धोकादायक असल्याबाबत

**(८०) * ४४०४८ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचल जवळेथर (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) रस्त्यावरील अर्जुना पुल व या रस्त्यावरील सर्वच मो-या वाहतुकीला धोकादायक बनल्या असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुलाच्या दोन्ही बाजुला दोन मोठे खड्डे पडल्याने हा पुल प्रवाशांसाठी धोकादायक बनला असून गेल्या चार वर्षापासून नव्याने रस्त्याचे बांधकाम करण्याबाबतची मागणी ग्रामस्थांकडून होत असतानाही याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग दुर्लक्ष करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अर्जुना पुलासाठी तळवडे ग्रामपंचायतीने दुरुस्तीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर करुन एक वर्ष उलटले तरी अद्यापी विभागाकडून कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त रस्त्याची पाहणी शासनाने केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार उक्त रस्ता तात्काळ नव्याने बांधण्याबाबत निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) नाही.

(३) याबाबत शासनाकडे कोणत्याही प्रकारची मागणी अथवा निवेदन आढळून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आलेल्या इंग्रजी स्पीकिंग कोर्सच्या योजनेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(८१) * ४१६५५ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांच्या माध्यमातून सन २०१३-१४ साली आदिवासी विद्यार्थ्यांच्या कोळवाडी (ता.पनवेल) येथील वसतीगृहात इंग्रजी स्पीकिंग कोर्स योजना राबविण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रशिक्षण देण्यासाठी ४ लाख ९६ हजार ३७६ रक्कमेचा ठेका लोकमाता अहिल्यादेवी होळकर शैक्षणिक व सेवाभावी संस्था लातूर यांना देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेत विदयार्थ्यांना इंग्रजी भाषेचे कोणतेच प्रशिक्षण देण्यात आले नसून केवळ गैरव्यवहार करुन विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याची धक्कादायक बाब माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणाची प्रकल्प अधिकारी, पेण यांच्यामार्फत सविस्तर चौकशी करण्यात आलेली असून त्यांनी दि.०८.०२.२०१६ च्या पत्रान्वये चौकशी अहवाल अपर आयुक्त, ठाणे यांना सादर केला आहे. वसतिगृहाचे तत्कालीन गृहपाल यांनी सदरची योजना राबविली नसल्याचे लेखी कळविलेले आहे. तसेच अपर आयुक्त, ठाणे यांच्या कार्यालयामार्फतही उक्त योजनेच्या गैरव्यवहाराबाबत चौकशी समिती नेमण्यात आलेली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल अप्पर आयुक्त, ठाणे यांना दि.०१.०३.२०१६ च्या पत्रान्वये सादर केलेला आहे.

सदर अहवालाचा अभ्यास करुन दोषींवर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल .

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हुपरी (जि. कोल्हापूर) येथील निराधार, अंध, अपंग अशा वृध्दांचे अनुदान बंद केल्याबाबत

**(८२) * ४४७२४ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हुपरी (जि. कोल्हापूर) येथील निराधार, अंध, अपंग अशा ५०० वृध्दांचे अनुदान शासनाने तब्बल ११ महिन्यापासून बंद केल्याने दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास या वृध्दांनी ठिया आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आंदोलनातील काही वृध्दांची तब्येत खालावली, हेे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निराधार, अंध, अपंग अशा ५०० वृध्दांचे अनुदान बंद करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या वृध्दांना तातडीने अनुदान वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) नाही.

(३) सामाजिक सर्व्हेक्षणाअंतर्गत स्थानिक पातळीवर पात्र/अपात्र लाभार्थ्यांची शोध मोहीम घेणेत आली त्यावेळी लाभार्थी स्थलांतरीत, उत्पन्नवाढ, मयत या कारणास्तव ५०५ लाभार्थ्यांचे अनुदान बंद करण्यात आले.

(४) उक्तप्रमाणे अपात्र लाभार्थ्यांची तहसिलस्तरावर घेण्यात आलेल्या सुनावणीअंती व संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या दि. ३०.०१.२०१६ रोजीच्या सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार ७१ लाभार्थी पात्र ठरले आहेत, तसेच ४६ लाभार्थी मयत आढळून आले आहेत. उर्वरीत ३८८ लाभार्थ्यांची

फेरसुनावणी घेऊन व संजय गांधी समितीसमोर निर्णयार्थ ठेऊन त्यांच्या पात्र/अपात्रतेबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**टोकावडे (ता.खेड, जि.पुणे ) येथील आश्रमशाळेची इमारत वापराविना पडून असल्याबाबत**

**(८३) * ४०९७२ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टोकावडे (ता.खेड,जि.पुणे) येथे आदिवासी मुलांकरिता ४ कोटी ९९ लक्ष रू. इतका निधी खर्च करून बांधण्यात आलेली आदिवासी विकास विभागाची आश्रमशाळेची इमारत वापराविना पडून असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी आदिवासी विकास मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

तथापि (टोकावडे, ता. खेड, जि. पुणे) येथील शासकीय आश्रमशाळेची शालेय इमारत व मुला/मुलींचे वसतीगृह बांधकामासाठी २०११ मध्ये प्रशासकीय मान्यता दिली होती. प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेपेक्षा अधिक खर्च झाला आहे. मात्र सदरची बांधकामे पुर्ण झालेले नाहीत. त्यामुळे इमारती वापरासाठी ताब्यात घेण्यात आलेली नाहीत.

(२) व (३) होय.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडून शासकीय आश्रमशाळा टोकावडे, ता. खेड, जि. पुणे येथील आदिवासी मुला-मुलींसाठी आश्रमशाळा बांधकामाबाबत सुधारित अंदाजपत्रक प्रस्ताव मागविण्यात आला आहे. सुधारित अंदाजपत्रक प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कळवण (जि. नाशिक) तालुक्यात विविध विभागांच्या**
**शासकीय निवासस्थानांची झालेली दुरावस्था**

**(८४) * ४७२९५ डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण (जि.नाशिक) तालुक्यात विविध विभागांच्या शासकीय निवासस्थानांची स्थिती अत्यंत बिकट असून हे निवासस्थान राहण्यायोग्य नसल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तहसील, पोली, पंचायत समिती विभागांचे अधिकारी-कर्मचारी या निवासस्थानात राहत असून त्यांनी अनेकदा दुरुस्तीची मागणी केली असता शासनाकडून कोणतीही दखल घेतली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुसरीकडे चांगली निवासस्थाने वापराविना पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तातडीने कळवण शासकीय निवासस्थानांची दुरुस्ती व डागडुजी करण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) संबंधीत उपभोक्ता खात्याच्या मागणीनुसार शासकीय निवासस्थांनाची वेळोवेळी डागडुजी व दुरुस्ती केली जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील व विशेषत: विदर्भातील सूत गिरण्या**
**आर्थिक अडचणीत असल्याबाबत**

**(८५) * ४०३७७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार**

**(सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात कापसाचे क्षेत्र मोठे असल्याने तेथील, कापसाच्या उत्पादनावर या भागात सूत गिरण्यांची संख्या २५ तर, जिनिंग-प्रेसिंगची संख्या ७६२ होती, हे खरे आहे काय,

(२) राज्य शासनाने सन २०११ पासून राबविलेल्या धोरणांची अंमलबजावणी करण्यावर भर देऊन राज्यभर ५११ प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले असून, यातील ५९ प्रकल्पांची उभारणी विदर्भात केली जाणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन वस्त्रोद्योग प्रकल्पांना २० टक्केच्या आसपास अनुदान दिले जाते, तथापि जुन्या सूत गिरण्यांचा तसेच जिनिंग-प्रेसिंगचा नवीन धोरणात समावेश न केल्याने, सूत गिरण्याची संख्या आता केवळ दोन-तीन वर आली असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, विदर्भातील ५ सुतगिरण्या अवसायनात काढण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, तसेच सदर सुतगिरण्यामधील कामगारांची १५ कोटी ५३ लाख २५ हजार रुपयांची देणी बाकी आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सहकारी सूतगिरण्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी मा.सहकार मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, जुन्या सूत गिरणीतील यंत्राचे आधुनिकीकरण करण्यासाठी, सूत गिरण्यांना अनुदानाची गरज असल्याने सदर अनुदान देऊन सूत गिरण्या वाचविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

राज्यात प्रति वर्ष कापसाचे उत्पादन सुमारे ७८.०० लाख गाठी असून त्यापैकी सुमारे ३५.०० लाख गाठी कापसाचे उत्पादन विदर्भात होत आहे. विदर्भ विभागात सहकारी क्षेत्रात ३१ सूतगिरण्या व खाजगी क्षेत्रांत ४५ सूतगिरण्या अशा एकूण ७६ सूतगिरण्या कार्यरत आहेत. तसेच विदर्भात जिनिंग प्रेसिंगची संख्या ५६२ इतकी आहे.

(२) हे खरे नाही.

राज्य शासनाने सन २०११ पासून राबविलेल्या धोरणांनूसार राज्यात ११८१ प्रकल्पाची उभारणी झाली असून त्यामध्ये विदर्भातील १०९ प्रकल्पांचा समावेश आहे.

(३) नविन वस्त्रोद्योग धोरणा अंतर्गत दि. १/४/२०११ पासून वित्तीय बँकेकडून कर्ज घेणाऱ्या व टफ योजने अंतर्गत पात्र राज्यातील सर्व सुतगिरण्या, जिनिंग प्रेसिंग व इतर पात्र वस्त्रोद्योग घटकांना व्याज सवलत मंजुर करण्यात येते. तसेच विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील वस्त्रोद्योग घटकांना १० टक्के भांडवली अनुदान मंजूर करण्यात येते.

(४) अंशत: खरे आहे.

विदर्भातील ५ सूतगिरण्या आर्थिक स्थितीमुळे डबघाईस आल्याने अवसायनात घेण्यांत आल्या असून अवसायणातील सहकारी सूतगिरणीतील कामगारांची देणी सुमारे रु. १५५३.२५ लाख आहे.

(५) मा. श्री. राहूल बोंद्रे, विधानसभा सदस्य व इतर यांनी दिनांक १६/१२/२०१५ रोजी विधानसभेत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सुचनेच्या अनुषंगाने मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी सूतगिरण्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी विधान भवन, नागपूर येथे दिनांक २२/१२/२०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

(६) जुन्या सूतगिरण्यांमधील यंत्राचे आधूनिकीकरण करण्यासाठी राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजने अंतर्गत अर्थसहाय्य देण्याची योजना असून सदर योजने अंतर्गत राज्यातील ११ सहकारी सूतगिरण्यांना रु. ५३.६० कोटी भागभांडवल व रु. १५७.९६ कोटी मुदती कर्ज उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच ज्या सहकारी सूतगिरण्या बँक/वित्तीय संस्थाकडून कर्ज घेवून आधुनिकीकरण किंवा क्षमता वाढवित असतील, अशा पात्र घटकांना देखील यंत्रसामुग्री करीता घेतलेल्या कर्जावरील ७ टक्के व्याज अनुदान मंजूर करण्याची व सदरची सूतगिरीणी कापूस उत्पादक क्षेत्रांतील असल्यास १० टक्के भांडवली अनुदान मंजूर करण्याची तरतूद राज्याच्या वस्त्रोद्योग धोरणात आहे.

-----------------

**शहापुर तालुक्यातील (जि.ठाणे) डोळखांब-चोंढे ते नगर तालुक्यातील कळसुबाई शिखरादरम्यानच्या घाट रस्त्यांची झालेली दुरावस्था**

**(८६) * ४७८३० श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापुर तालुक्यातील (जि.ठाणे) डोळखांब-चोंढे ते नगर तालुक्यातील कळसूबाई शिखरादरम्यानच्या ९ किलोमीटर घाट रस्त्यांची दुरावस्था झाली असल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) विषयांकित रस्ता अस्तित्वात नसून तो सरंक्षित वन जमिनीच्या विभागातून जातो. त्यामुळे सदरच्या रस्त्याचे काम हाती घेता आले नाही.

-----------------

**सिंहगड (जि.पुणे) येथील तंत्रशिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शुल्क प्रतिपुर्ती मिळणेबाबत**

**(८७) * ४९१४५ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील सिंहगड तंत्रशिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतीपुर्तीचे सुमारे १२१ कोटी ८० लाख रुपये समाजकल्याण विभागाने माहे डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत दिलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) सदर संस्थेला थकीत रक्कम त्वरीत देण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून न्युक्लीअर बजेटअंतर्गत साहित्याचे वाटप न झाल्याबाबत

**(८८) * ४१३४० डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनूरी (जि.हिंगोली) तालुक्यातील आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून न्युक्लीअर बजेटअंतर्गत लाभार्थ्यांना मिळणाऱ्या टिनपत्रे, ताडपत्री, शिलाई मशिन, ऑईल इंजिन, तुषार संच, ठिबक संच, पीव्हीसी पाईप, सोयाबीन चाळणी यंत्र आदि साहित्य मिळण्यासाठी लाभार्थ्यांकडून अर्ज करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन वर्षा पासून या साहित्याचे वाटप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, आदिवासी विकास विभागाच्या या योजनेचा लाभ लाभार्थ्यांना त्वरीत मिळावा, यासाठी शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

न्युक्लिअस बजेट योजनेतंर्गत सन २०१३-१४ मध्ये टिनपत्रे, ताडपत्री, शिलाई मशिन, ऑईल इंजिन, तुषार संच, ठिबक संच, पीव्हीसी पाईप, सोयाबीन चाळणी यंत्र इ. साहित्य एकूण ३०० लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेले आहे. सन २०१४-१५ मध्ये तुषार संच, सोयाबीन चाळणी, ताडपत्री, टिनपत्रे इ. साहित्य

एकूण १४४ लाभार्थ्यांना वाटप करण्यात येत आहे. सन २०१५-१६ या वर्षातील सदर योजनेतंर्गत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी - कल्याण - शीळ उन्नत महामार्ग व कल्याण फाटा ते कळंबोली रस्ता आठ पदरी करण्याबाबत

**(८९) * ४११८२ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यामध्ये एमएमआरडीए व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून भिवंडी-कल्याण-शीळ उन्नत महामार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण फाटा ते कळंबोली सहा पदरी महामार्ग आठ पदरी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०५ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भिवंडी - कल्याण - शीळ उन्नत महामार्ग व कल्याण फाटा ते कळंबोली महामार्ग आठ पदरी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे, भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्यावर साखळी क्र. ०/०० ते २१/०० दरम्यान उपलब्ध लांबीत सहापदरीकरण व उर्वरित लांबीत उन्नत मार्ग बांधण्याच्या प्रस्तावास मंत्रीमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने दिनांक ३०.११.२०१५ च्या बैठकीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास अंमलबजावणी यंत्रणा म्हणून घोषित करण्यास मान्यता दिली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) त्यानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार नेमण्याची प्रक्रिया पार पाडली असून पुढील

सहा महिन्यात सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येणार असून प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सुसाध्य होत असल्यास व प्रशासकिय मान्यता मिळाल्यावर निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्प हाती घेण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. कल्याण फाटा ते कळंबोली रस्ता या सध्याच्या चार पदरी रस्त्याचे आठपदरीकरण करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या विचाराधीन नाही.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांना गाळप झालेल्या उसाच्या एफआरपीपैकी ८० टक्के रक्कम देण्याबाबत**

**(९०) * ४००५८ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.संजय सावकारे (भुसावळ), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)दिनांक १५ डिसेंबर अखेर गाळप झालेल्या ऊसाचे एफआरपी पैकी ८० टक्के रक्कम शेतकऱ्यांना दिनांक ३१ डिसेंबर पुर्वी देण्याचे आदेश शासनाने दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील मागील वर्षी गाळप केलेल्या उसापोटी एफआरपीचे ३२८ कोटी रुपये राज्यातील ४४ साखर कारखान्यांनी थकवलेले असल्याचे व कोल्हापुर विभागाअंतर्गत साखर कारखान्यांमध्ये डिसेंबर अखेर गाळप झालेल्या ऊसाच्या बिलापोटी शेतकऱ्यांना अद्याप ४६५.३८ कोटी रूपये दिलेले नसल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, केवळ १० कारखान्यांनी ८०% रक्कम दिली आहे, तर ४ कारखान्यांनी हगांम सुरू झाल्यापासून एकही रूपया अदा केलेला नाही, हे खरे आहे काय,

(४) तसेच, साखर आयुक्तांकडून एफआरपीनुसार शेतक-यांना पैसे न देणा-या ५१ साखर कारखान्यांना गाळप परवाना रद्द करण्याच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दिनांक ३१ डिसेंबर पुर्वी रक्कम अदा न केलेल्या कारखान्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे अथवा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) हंगाम २०१४-१५ मधील FRP प्रमाणे एकूण रु. १९१२०.८० कोटी देय रक्कमेपैकी राज्यातील कारखान्यांनी शेतकऱ्यांना रु. १८८९४.९० कोटी देयके अदा केली असून दि. १५/०२/२०१६ अखेर १७८ पैकी ३३ कारखान्यांकडे रु. २५७.४८ कोटी देयके थकीत आहेत.

कोल्हापूर विभागातील ३८ कारखान्यांनी सन २०१५-१६ चा हंगाम सुरु केला आहे. त्यांनी माहे जानेवारी, २०१६ अखेर FIR प्रमाणे एकुण रु. २७२२.३९ कोटी देय रक्कमेपैकी शेतकऱ्यांना रु. १८२२.५३ कोटी देयके अदा केली असून रु. ९००.३४ कोटी देयके थकीत आहेत.

(३) FIR च्या ८०% प्रमाणे कोल्हापूर विभागातील ३८ पैकी ९ कारखान्यांनी संपुर्ण देयके अदा केली असून २९ कारखान्यांकडे दि. १५/०२/२०१६ अखेर रु. ४२०.०५ कोटी थकीत आहेत. हंगाम सुरु झाल्यापासून एकही रुपया अदा केलेला नाही असा एकही कारखाना नाही.

(४) एफआरपीनुसार शेतकऱ्यांना पैसे न देणाऱ्या राज्यातील ५९ कारखान्यांना साखर आयुक्तालयाकडून गाळप परवाना रद्द करण्याच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत.

(५) सन २०१४-१५ ची FIR अदा न केलेल्या १२ साखर कारखान्यांचे हंगाम २०१५-१६ चे गाळप परवाने निलंबित केलेले आहेत.

तर विना परवाना गाळपाबाबत ५ कारखान्यांवर दि.१५/०१/२०१६ आदेशाअन्वये दंडात्मक कारवाई केली आहे.

तसेच २ कारखान्यांवर दि.१८/०१/२०१६ चे आदेशान्वये RRC कारवाई करण्यात आली आहे.

-----------------

**यवतमाळ जिल्हा रेशीम केंद्र कार्यालयातील रेशीम विकास अधिकारी यांनी सहल व प्रशिक्षणाकरीता शेतक-यांच्या नावावर गैरव्यवहार केल्याबाबत**

**(९१) * ४७७५५ श्री.मदन येरावार (यवतमाळ), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा रेशीम केंद्र कार्यालयातील रेशीम विकास अधिकारी यांनी सहल व प्रशिक्षणाकरीता शेतक-यांच्या नावावरील रूपयांचा मोठया प्रमाणात गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतक-यांच्या नावावर लाखो रूपयाचा गैरव्यवहार रेशीम विकास अधिकारी यांनी केल्यासंदर्भात रेशीम विभागातील क्षेत्र सहाय्यक श्री. देवराव भगत यांनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१५ रोजी वडगांव रोड पोलिस स्टेशन येथे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणात यवतमाळ जिल्हा रेशीम केंद्र अधिकारी यांनी १३४ शेतक-यांचे सहलीसाठी व ५९ शेतक-यांचे प्रशिक्षणासाठी तब्बल २५ ते ३० लाख रुपये खर्च दाखवून परस्पर उचल करून गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणात दाखविण्यात आलेल्या यादीमध्ये बरेच शेतकरी मयत असून त्यांच्या नावावर सहलीसाठी पैसे काढण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर सहल व प्रशिक्षणाकरीता दाखविण्यात आलेली वाहने अस्तीत्वात नसतांना पैसे घेण्यात आले, हे ही खरे आहे काय याबाबत श्री. भगत यांनी दिनांक ११ नोव्हेंबर, २०१५ ला पोलिस अधिक्षक, यवतमाळ यांच्याकडे केलेल्या तक्रारीत म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) तक्रार केली असल्याचे खरे आहे.

(३) नाही

(४) नाही

(५) वाहने अस्तित्वात नसतांना पैसे घेण्यात आल्याच्या मुद्यात तथ्य नाही.

(६) तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असून चौकशीत तक्रारीतील मुद्यात तथ्य नसल्याचे आढळूण आले आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहांमधील सोलर वॉटर हिटर खरेदी व बायोमॅट्रिक यंत्रणा बसविण्यामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(९२) * ४०८१० श्री.छगन भुजबळ (येवला), प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहांमधील सोलर वॉटर हिटर खरेदी व बायोमॅट्रिक यंत्रणा बसविणे या प्रकरणांमधील गैरव्यवहारांची चौकशी करण्यासाठी शासनाने नेमलेल्या समितीने माहे मे, २०१५ पर्यंत शासनास चौकशी अहवाल सादर करणे आवश्यक होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत समितीने शासनास अहवाल सादर केलेला आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच राज्यातील शासकीय आश्रमशाळा वा वसतिगृहांमधील नादुरुस्त सोलर वॉटर हिटर व बायोमॅट्रिक यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी शासनामार्फत कोणती तातडीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहांमधील सोलर वॉटर हिटर खरेदी व बायोमेट्रीक यंत्रणा बसविणे या प्रकरणांमधील गैरव्यवहारांची चौकशी करण्यासाठी दि.१६/४/२०१४ च्या शासन निर्णयान्वये श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव व विभागीय चौकशी अधिकारी (१), सामान्य प्रशासन विभाग यांची एक सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीला चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी दि.१४/०७/२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. तथापि श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव व चौकशी समिती अध्यक्ष यांनी दि.२/६/२०१५ च्या पत्रान्वये त्यांची नियुक्ती संयुक्त राष्ट्र संघाच्या कार्यालयात झाल्याने सदर चौकशी पूर्ण करणे शक्य होणार नसल्याचे कळविले नुसार सदर प्रकरणाची उर्वरित चौकशी करण्यासाठी दि.११/९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सचिव व विशेष चौकशी अधिकारी-१, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची "चौकशी अधिकारी" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदर प्रकरणी चौकशीची कार्यवाही सुरू असून चौकशी अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहावर बसविलेले व सद्यस्थितीत बंद असलेले सोलर वॉटर हिटरचे सर्वेक्षण करून त्याच्या दुरूस्तीबाबतचे अंदाजपत्रक सादर करण्यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांच्याशी संपर्क साधण्यात येत असून या प्रकरणी सोलर वॉटर हिटर पुरवठादार यांची प्रलंबित असलेली १० टक्के रक्कम तसेच पुरवठादारची बँक गॅरंटी (EMD) जप्त करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यात गुंतवणूक व उद्योग वाढीसाठी सुरु केलेल्या विशेष आर्थिक क्षेत्राला (एसईझेड) प्रतिसाद मिळत नसल्याबाबत

**(९३) * ४०७९८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुंतवणूक व उद्योग वाढीसाठी सुरु केलेल्या विशेष आर्थिक क्षेत्राला (एसईझेड) विशेष प्रतिसाद मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन याबाबत वेगळा पर्याय शोधत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एसईझेड ची अधिसूचना निघालेल्या व मंजूर झालेल्या अशा जवळ पास २४ प्रकल्पांनी माघार घेतली आहे व ४२ ठिकाणी काहीच न झाल्याने अडीच हजार हेक्टर जागा मोकळी होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गुंतवणूक व उद्योग वाढीसाठी एसईझेडला प्रतिसाद मिळण्यासाठी शासन काय उपाययोजना करीत आहे,
(५) नसल्यास, त्याची काय कारणे आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय.
(२) अधिसूचना रद्द केलेल्या/प्रस्ताव मागे घेण्यात आलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रांच्या जमिनीचा वापर करण्याबाबत एकात्मिक औद्योगिक क्षेत्रे विकसित करण्यासंबंधीचे धोरण शासनाने घोषित केले आहे.

त्यानुसार एकूण अधिसूचित क्षेत्राच्या किमान ६० टक्के क्षेत्र हे औद्योगिक विकासासाठी आणि उर्वरित ४० % क्षेत्र हे पूरक बाबीच्या विकासासाठी, ज्यामध्ये तीन चतुर्थांश क्षेत्र हे रहिवासी आणि इतर बिगर रहिवासी वापरासाठी व एक चतुर्थांश क्षेत्र हे निव्वळ वाणिज्यिक/आर्थिक कार्यासाठी, वापरता येणार आहे.
(३) केंद्र शासनाचे विशेष आर्थिक क्षेत्राविषयी बदलेले धोरण, जागतिक नोंदी व बाजारातील चढउतार यामुळे १९ अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्र सुमारे ३००१.८० हेक्टर ना-अधिसूचित करण्याचे व ५२ मंजूर विशेष आर्थिक क्षेत्र सुमारे ७४०८.०५ हेक्टर प्रस्तावातून बाहेर पडण्याचे प्रस्ताव संबंधित विकासकांनी केंद्र शासनास सादर केले आहेत.
(४) राज्याच्या विशेष आर्थिक क्षेत्राच्या संदर्भात अवलंबिलेल्या प्रचलित धोरणानुसार विशेष आर्थिक क्षेत्राच्या विकासकांना व घटकांना मुद्रांक शुल्कातून सूट, मुल्यवर्धित कराचा कालबध्द पध्दतीने परतावा, अकृषित आकारणीतून सूट तसेच गौण खनिजांच्या स्वामित्व धन आकारणीतून सूट देण्यात येते,

विशेष आर्थिक क्षेत्राच्या प्रस्तावांच्या छाननीसाठी मा.मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुरंदर (जि.पुणे) येथील पानवडी घाटातील रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत

**(९४) * ४२२१८ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि. पुणे) तालुक्यातील पानवडी घाटात एका वर्षापूर्वी दिनांक २७ डिसेंबर, २०१४ रोजी पोलीसांची जीप उलटून तीन कर्मचाऱ्यांचा बळी गेल्यानंतर या घाटाच्या रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण, संरक्षक कठडे अशी कामे तातडीने करण्यात येतील अशी आश्वासने देऊनही अद्यापपर्यंत काहीच कार्यवाही झाली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील घाट रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण, संरक्षक कठडे बांधण्याबाबत शासने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) प्रश्नांकित रस्ता हा १.५ कि.मी. लांबीच्या अरुंद घाट रस्ता असून अलिकडेच प्रजिमा म्हणून दर्जोन्नत झालेला आहे. सदर घाट रस्त्याचे घाट कटिंग, वळण सुधारणा, रुंदीकरण व डांबरीकरण, संरक्षक कठडे बांधणे इत्यादी कामे सद्यस्थितीत प्रस्तावाधिन असून निधी, निकष व प्राथम्यक्रमाने हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दहेगाव (ता.मनमाड,जि.नाशिक) येथील शाळेच्या जागेचे भाडे थकीत असल्याबाबत

**(९५) * ४२९६१ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर),**

**श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड (जि.नाशिक) तालुक्यातील २ कि.मी. अंतरावर दहेगावात सामाजिक न्याय अंतर्गत असलेल्या ज्ञान प्रसारक संचलीत प्राथमिक शाळा असून या शाळेच्या जागेचा मालक व संस्थाचालक यांच्यात इमारतीच्या थकीत भाडे संदर्भात वाद झाल्याने मालकाने शाळेला टाळे ठोकल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळेतील १६१ विदयार्थ्यांना झाडाखाली बसून शिक्षण घ्यावे लागत असून हे विदयार्थी पोषण आहारापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना सर्व सोयीसुविधा मिळण्याबाबत तसेच आश्रम शाळेच्या थकित भाडयाची पूर्तता करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण नाशिक यांनी त्यांच्या स्तरावरुन याबाबत मुख्याध्यापक यांना इमारत भाडे प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील संत मिराबाई शासकीय मुलींचे वसतीगृह आणि डॉ.बाबासाहेब शासकीय मुलांचे वसतीगृहातील कर्मचाऱ्यांचे मानधन थकित असल्याबाबत

**(९६) * ४४४७४ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) बी.डी.डी. चाळ परिसरातील संत मिराबाई शासकीय मुलींचे वसतीगृह आणि डॉ.बाबासाहेब शासकीय मुलांचे वसतीगृहातील कर्मचाऱ्यांचे

मानधन गेल्या अनेक महिन्यांपासून थकित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदरहू वसतीगृहातील कर्मचाऱ्यांचे थकीत मानधन अदा करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

सदर शासकीय वसतिगृहामधील पदे कायमस्वरूपी असून, एकही पद मानधनावर नसल्याने, सदर कर्मचाऱ्यांचे मानधन थकीत नाही.

(२) ते (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(९७) * ४६१६७ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी यांचेवर असलेल्या गैरव्यवहाराच्या आरोपांची चौकशी होऊन यामधील अनेक गंभीर बाबी समोर आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर बाबी समोर येऊन देखील संबधित दोषींवर कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे दोषी अधिकाऱ्यांचे तातडीने निलंबन करावे या मागणीसाठी भारतीय आदिवासी पँथरच्या वतीने आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्या कार्यालयासमोर माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान उपोषण करण्यात आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या गैरव्यवहाराप्रकरणी संबधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) संबंधित अधिकाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित असून त्यांना विभागीय चौकशीच्या अधिन राहून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जालना-बीड राज्य महामार्गाकरिता अंबड शहराच्या बाहेरुन बायपास रस्ता करणेबाबत**

**(९८) * ५००८३ श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना-बीड राज्य महामार्ग अंबड शहरातून जात असल्यामुळे रहदारीस अडथळा होत असल्याने अंबड शहराच्या बाहेरुन बायपास रस्ता करण्याच्या मागणीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाचा अंतिम निर्णय झाला आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार अंबड शहराच्या बाहेरुन बायपास रस्ता करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना जिल्हा परिषद समाजकल्याण विभागामार्फत अपंगासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनाना निधीची कमतरता असल्याबाबत

**(९९) * ४७३२५ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हा परिषद समाजकल्याण विभागामार्फत अपंगासाठी विविध योजना राबविण्यात येत असून निधीच्या कमतरतेमुळे अपंगाचे विविध प्रस्ताव पडून असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे प्रस्ताव प्रलंबित असण्याची कारणे काय आहे,

(३) असल्यास, यास जबाबदार असणा-यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

जालना जिल्हा समाजकल्याण कार्यालयामार्फत अपंगांना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजना राबविण्यात येते. सन 2013-14 या वर्षातील रु.8.40 लाख तरतुदीमधून एकूण 50 लाभार्थ्यांचे प्रस्ताव निकाली काढण्यात आले. सन 2014-15 या वर्षामध्ये उपलब्ध तरतुदीतून 54 लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात आले. सन 2015-16 या वर्षामध्ये सदर कार्यालयातील एकूण 318 प्राप्त पात्र प्रस्ताव शिफारशींसह जिल्ह्यातील सर्व बँकांना पाठविण्यात आलेले आहेत. चालू आर्थिक वर्षात बँकांकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावांना संबंधित बँकेच्या मंजूरीनंतर संबंधित लाभार्थ्यांस 20 टक्के अनुदान वितरणाची कार्यवाही चालू आहे.

(४) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी, वाडा व शहापुर तालुक्यातील औद्योगिक वसाहतीत अग्निशमन दलाची उभारणी करण्याबाबत**

**(१००) * ४४६९० श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी, वाडा व शहापुर तालुक्यातील ग्रामीण भागात औद्योगिक वसाहती, गोदामे व इतर उद्योग व्यवसाय सुरु असून औद्योगिक क्षेत्रासह मोठया व्यावसायिक ठिकाणी आग लागण्याच्या घटना वारंवार घडत असल्याने तेथे मोठया प्रमाणात वित्त हानी होत असल्याने अग्निशमन दलाची अद्ययावत यंत्रणा उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी-भिवंडी पूर्व यांनी मा.मुख्यमंत्री, मा.उद्योग मंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने माणकोली, पडघा व अंबाडी या तीन ठिकाणी अग्निशमन दलाची उभारणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व याबाबत सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**राज्यातील पतसंस्थांसाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करण्याबाबत**

**(१०१) * ४१८१४ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पतसंस्थांची चळवळ सशक्त व्हावी व या क्षेत्रातील अडचणी सोडवून आवश्यक उपाययोजना करण्यासाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करण्यात

येणार असल्याचा निर्णय मा. सहकारमंत्री यांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी आतापर्यंत कोणती कार्यवाही केली व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) तसेच राज्यातील बहुतांशी पतसंस्था ढबघाईला आलेल्या असून ठेवीदाराही अडचणीत सापडत असल्याने पतसंस्थांच्या सक्षमीकरणासाठी सदर प्रकरणी निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये स्वतंत्र प्रकरण "XI-१A बिगर कृषि सहकारी पतसंस्था" नव्याने दाखल करण्याचे प्रस्तावित असुन त्यामध्ये पतसंस्थांसाठी महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्थांचे नियामक मंडळ स्थापन करण्याची तरतूद आहे.
(२) व (३) केंद्र शासनाच्या हरकती व सुचना तसेच राज्यातील निवडक पतसंस्थांच्या प्रतिनिधीसमोर केलेल्या सादरीकरणावेळी त्यांच्याकडून प्राप्त सुचनांच्या अनुषंगाने मसुद्यात आवश्यक त्या सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाने गैरव्यवहारात गुंतलेल्या तत्कालीन संचालकांवर सहकारी बँकेची निवडणूक लढण्यास बंदी घालण्याबाबत

**(१०२) * ३९७६६ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बरखास्त केलेल्या राज्य सहकारी बँक आणि जिल्हा बँका यांच्या गैरव्यवहारात गुंतलेल्या तत्कालीन संचालकांवर पुढील दहा वर्षे कोणत्याही

सहकारी बँकेची निवडणूक लढण्यास बंदी घालण्याचा निर्णय राज्य शासनाने मंगळवार दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) सदर निर्णयाचे स्वरुप पुढीलप्रमाणे :- ज्या सहकारी बँकेचे संचालक मंडळ कायदा कमल ११० नुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मागणीनुसार बरखास्त केलेले आहे. अशा सहकारी बँकेच्या संचालकास, त्या बँकेवर अथवा अन्य कोणत्याही बँकेवर संचालक मंडळ बरखास्त केल्याच्या दिनांकापासून पुढील दोन संचालक मंडळाच्या कालावधीपर्यंत तसेच तरतूदीच्या दिनांकापासून पाठीमागे १० वर्षापर्यंत संचालक म्हणून पुन्हा निवडून येण्यास, पुन्हा नामनिर्देशन केले जाण्यास किंवा पुन्हा स्विकृत केले जाणास किंवा असा सदस्य निवडून आला असला तरीही, संचालक पद धारण करण्यास अपात्र ठरविण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७३ कअमध्ये पोटकलम (३अ) नव्याने समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(३) मंत्रीमंडळाने दि. ५ जानेवारी, २०१६ रोजी घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये कलम ७३-कअ मध्ये पोटकलम (३अ) नव्याने समाविष्ट करण्यासंदर्भात दि. २१ जानेवारी, २०१६ रोजीच्या राजपत्रात अध्यादेश प्रख्यापित केला आहे.

उक्त अधिनियमातील सुधारणेनुसार रिझर्व्ह बँकेचे मागणीनुसार निष्प्रभावित करण्यात आलेल्या बँकेच्या व्यवस्थापक समितीवर सदस्य, सध्या ज्या सहकारी बँकाकडे व्यवस्थापक सदस्य म्हणून कार्यरत आहेत. अशा सदस्यांना व्यवस्थापक समिती सदस्य पदावरुन काढून टाकण्याची कार्यवाही संबंधित निबंधकामार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील एनएसएफडीसी योजनेअंतर्गत महिंद्रा मॅक्सिमो कंपनीच्या गाडया फॅब्रिकेशन व बॉडिबिल्डींगचे काम करण्यासाठी वर्कशॉपमध्ये पडून असल्याबाबत

**(१०३) * ४४४२४ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील टिकुजीनीवाडी मधील सानवा मोटर्स प्रा.लि.चे व्यवस्थापकीय संचालक संजीव मिस्त्री यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या व्यवस्थापनासह, राज्याचे सामाजिक न्याय मंत्री यांच्याशी लेखी पत्रव्यवहार करुन त्यांच्याकडे एनएसएफडीसी योजनेअंतर्गत फॅब्रिकेशन व बॉडीबिल्डींग करीता महिंद्रा मॅक्सीमो च्या ५९ गाडया देण्यात आल्या होत्या, त्यांचे काम पूर्ण होऊन व बिल मिळाले असूनही त्या गाडया ताब्यात घेत नसल्याची बाब माहे नोव्हेंबर वा डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, एनएसएफडीसी योजने अंतर्गत भाजीपाल्याची ने-आण करण्यासाठी महिंद्रा मॅक्सिमो कंपनीच्या ५९ गाडया खरेदी करणे, त्याचे फॅब्रिकेशन व बॉडिबिल्डींगचे काम करण्यासाठी एकूण किती खर्च करण्यात आला आहे,

(३) सदर ५९ गाड्या गेल्या दोन वर्षापासून सानवा मोटर्सच्या टप्प्यातील टिकुजीनीवाडी वर्कशॉपमध्ये असून, त्या सडण्याच्या मार्गावर असल्याने शासनाचे होत असलेले कोट्यावधी रुपयांचे नुकसान व ज्या लाभार्थ्यांना या गाड्या देण्यात येणार होत्या त्यांनाही त्याचा लाभ मिळत नसल्याने सानवा मोटर्सचे संचालक श्री. संजीव मिस्त्री यांनी राज्य शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करुनही या गाड्या ताब्यात न घेण्याची कारणे काय आहेत,

(४) उपरोक्त ५९ गाड्या ताब्यात घेऊन भविष्यात होणारे कोट्यवधी रुपयांचे नुकसान वाचविण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे तसेच गेल्या दोन वर्षापासून त्या गाड्या ताब्यात घेऊन लाभार्थींना त्याचे वाटप करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांविरोधात काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) यासाठी एकूण रु. ३,८०,०८,४४९/- इतका खर्च करण्यात आला आहे.

(३) व (४) मे. सानवा मोटर्स यांनी त्यांचे दि. २४.०३.२०१४ च्या पत्रान्वये ५९ तयार गाड्या ताब्यात घेण्याबाबत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या अवगत केले होते. तथापि, महामंडळाच्या कार्यप्रमाणालीत कर्ज मंजूरीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक या पदाकडे असून, तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक व अध्यक्ष यांनी लाभार्थी निवडीचा वेळीच निर्णय न घेतल्याने सदर गाड्या लाभार्थ्यांना वाटप करण्यास विलंब झाला. दरम्यानच्या कालावधीत सीआयडी मार्फत महामंडळाच्या झालेल्या तपासामध्ये संबंधित अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून, याबाबत तपास सुरु आहे. तद्नंतर सदरील वाहन वितरणास दिनांक ०५.०८.२०१५ च्या शासन पत्रान्वये परवानगी देण्यात आली. त्यानुसार निवड समितीमार्फत मंजूर झालेल्या कर्ज प्रकरणांमधील लाभार्थ्यांना वाहन वाटपास मंजूरी देण्याची कार्यवाही महामंडळामार्फत सुरु असुन, आज अखेर २४ वाहनांच्या वितरणाचे आदेश महामंडळाकडून निर्गमित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सोलापूर शहरातील भारत अर्बन को.ऑप.बँक लि.**
**मध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(१०४) * ४०८८५ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील शुक्रवार पेठ येथील भारत अर्बन को.ऑप.बँक लि. बँकेचे चेअरमन, व्हाईस चेअरमन व इतरांनी ठेवीदारांच्या ठेव रक्कमांचा करोडो रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी ठेवीदार सदस्यांनी जेलरोड पोलिस ठाणे, सोलापूर शहर येथे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, ठेवीदारांच्या ठेवीच्या किती रकमेचा गैरव्यवहार केला असल्याचे

निदर्शनास आले आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी संबंधित पदाधिकारी यांच्यावर कोणती फौजदारी कारवाई करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय,

प्राधिकृत अधिकारी श्री. बी सी पवार विशेष लेखापरिक्षक फिरते पथक सोलापूर यांनी जेलरोड पोलिस ठाणे, सोलापूर शहर येथे गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा करीत आहेत.
(३) ठेवीदारांच्या रु. १३७.२६ लाख रकमेचा अपहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे.
(४) जेलरोड पोलीस स्टेशन येथे फौजदारी गुन्हा रजिस्टर क्रमांक २८६/२०१५ दि. १९.१२.२०१५ रोजी दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सफाळे येथील वैतरणा नदीवरील पारगावच्या पूलाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१०५) * ४८३६१ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सफाळे येथील वैतरणा नदीवरील पारगावचा पूल खचल्यामुळे योग्य त्या दुरुस्ती अभावी कोसळण्याच्या अवस्थेत असल्याने दिनांक १४ डिसेंबर, २०१४ पासून सदरहू पूल रहदरीसाठी बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पूल वाहतुकीस उपलब्ध होण्याकरिता शासनस्तरावर कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सदर पुल फक्त अवजड वाहतुकीकरीता डिसेंबर, २०१४ पासून बंद करण्यात आला आहे.

(२) होय.

(३) सदर पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासकीय कार्यालयात रॅम्प किंवा रेलिंगची सुविधा नसल्याबाबत**

**(१०६) * ४०८७४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तसेच रायगड जिल्हयातील अन्य शासकीय कार्यालयात रॅम्प किंवा रेलिंगची सुविधा नसल्यामुळे अपंग व्यक्तींना पायऱ्या चढण्याकरिता मोठ्या प्रमाणात त्रास होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्थेने एकूण अर्थसंकल्पाच्या तीन टक्के रक्कम अपंगांच्या कल्याणाकरिता खर्च करणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निधी अपंगासाठी खर्च केला जात नसल्यामुळे शासकीय कार्यालयात अपंग व्यक्तींना सुविधा मिळत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासानाने चौकशी करून शासकीय कार्यालयात अपंगांना सुविधा मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करीत आहे काय,

(५) असल्यास, कारवाईचे स्वरूप काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद, रायगडच्या प्रशासकीय इमारतीमध्ये स्टील कठडा रेलिंग तसेच लिफ्टची सुविधा उपलब्ध आहे. तसेच अपंगांसाठीचे कार्यालय तळ मजल्यावर असल्याने अपंग व्यक्तींना पायऱ्या चढण्याचा त्रास होत नाही. तथापि,

जिल्हा परिषद, रायगड यांच्या अधिनस्त कार्यालयांमध्ये अपंग व्यक्तींना मुक्त संचार करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

जिल्हा परिषद, रायगड कार्यालयामार्फत सन २००२-०३ पासून स्वउत्पन्नाच्या ३ टक्के निधी अपंग कल्याणासाठी राखून ठेवण्यात येऊन खर्च केला जात आहे. अतिरिक्त जिल्हाधिकारी, रायगड यांचे अध्यक्षतेखाली अपंग व्यक्तींसाठी अडथळाविरहित वातावरण निर्मितीकरीता जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात आलेली असून,सदर समितीमध्ये सर्व प्रकारच्या अपंगांचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर ३ टक्के निधीमधून जुन्या इमारतींचे ॲक्सेस ऑडीट करणे, रँम्प, रेलिंग, टॉयलेट-बाथरुम, पाण्याची व्यवस्था, लिप्ट, लोकेशन बोर्ड इत्यादी व्यवस्था करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दि. १० मार्च, २०१३ व दि. १० मे, २०१३ च्या शासन परिपत्रकान्वये अपंगांकरीता अडथळा विरहित वातावरण निर्मितीबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच केंद्र शासनाच्या सुगम्य भारत योजनेतंर्गत अपंग (दिव्यांग) व्यक्तींना संचारासाठी आवश्यक असलेल्या सोयी सुविधा/व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

---

## औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातील मागासवर्गीय प्रवर्गासाठीच्या निधीबाबत

**(१०७) * ४२७६२ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातील मागासवर्गीय प्रवर्गासाठी असलेल्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचा पाच कोटीचा निधी दोन वर्षापासून अखर्चित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही.
(३) सन 2014-15 मध्ये जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातील मागास प्रवर्गासाठी असलेल्या वैयक्तिक लाभार्थी योजनासाठी लाभार्थी निश्चित झाले नसल्याने निधी पूर्णत: खर्च करण्यात आलेला नाही.

तथापि, सन 2015-16 मध्ये सदर निधी पूर्णत: खर्च करण्यात येणार असून ई-निविदाद्वारे पुरवठा आदेश देण्यात येणार आहेत.

-----------------

**मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाबाबत**

**(१०८) * ४०१८३ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील इंदापूर ते पत्रादेवी या मार्गाचे चौपदरीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०११ पासून सुरू असलेल्या पनवेल ते इंदापूर यादरम्यानच्या चौपदरीकरणाच्या कामाबाबत शासनाकडून वारंवार आश्वासन देवूनही या कामात प्रगती नाही, हेही खरे आहे काय,
(३) तसेच या महामार्गाच्या चौपदरीकरणामुळे बाधित होणाऱ्या तारा बांधनवाडी व त्या परिसरातील ग्रामस्थांनी मागील ८ वर्षापासून सातत्याने जिल्हाधिकारी, रायगड, पालकमंत्री, रायगड जिल्हा, मा.सार्वजनिक बांधकाममंत्री आदींकडे लेखी निवेदनाद्वारे तसेच मोर्चे, आंदोलने करूनही त्या समस्यांबाबत शासनाचे दुर्लक्ष झाले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे तारा बांधनवाडी येथील बांधकामांना चालू बाजारभावाप्रमाणे मोबदला देण्यात यावा, त्यांचे पुनर्वसन करण्यात यावे, योग्य सुविधा मिळाव्यात यासह अन्य मागण्यांसाठी पळस्पे-इंदापूर राष्ट्रीय महामार्ग रूंदीकरण प्रकल्पग्रस्त कृती समितीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक २९ डिसेंबर, २०१५ पासून बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रश्नांबाबत शासन काय उपाययोजना करत आहे वा करणार आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

पळस्पे ते इंदापूर या राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ (जुना १७) च्या कर्नाळा पक्षी अभयारण्य क्षेत्रामधील महामार्ग रुंदीकरणासाठी पर्यावरण व वन विभागाची मंजुरी, जलवाहीन्यांचे स्थलांतर तसेच मौ. काराव, नागोठणे व कोलेटी येथील भूसंपादन या बाबी अद्यापही प्रलंबित असल्याने तसेच, उद्योजकाकडून दिरंगाई झाल्याने कामास विलंब झालेला आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रकल्पग्रस्त कृती समितीने दिनांक २९.१२.२०१५ रोजी जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले होते, तथापि सदर गावातील आंदोलनापुर्वी पळस्पे-इंदापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. १७ रुंदीकरण प्रकल्पग्रस्त समितीतर्फे जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयाकडे महामार्ग बाधितांच्या समस्येबाबत दिनांक १७.१२.२०१५ रोजी दिलेल्या अर्जासंदर्भात मौजे कर्नाळा तारा गावचे ग्रामस्थ हे दिनांक २३.१२.२०१५ रोजी सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पेण उपविभाग, पेण यांच्या कार्यालयात येऊन त्यांच्या मागणीनुसार राष्ट्रीय महामार्गाच्या संपादनाबाबत त्यांचे समाधान झाल्याने दिनांक २८.१२.२०१५ पासून प्रकल्पग्रस्त समितीच्या वतीने करण्यात येणारे आमरण उपोषण व ठिय्या आंदोलन मागे घेण्याबाबतचे पत्र दिनांक २३.१२.२०१५ रोजी लेखी स्वरुपात दिले होते. तथापि सदर समितीच्या दुसऱ्या गटाने जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले होते. तथापि कर्नाळा तारा ग्रामस्थांच्या हरकती राहिलेल्या नसल्याने कोणत्याही मागण्या प्रलंबित राहिलेल्या

नाहीत. त्यामुळे सदर आंदोलन मागे घेण्यात आले आहे. तसेच गट ग्रामपंचायत, कर्नाळा-तारा यांनी कामकाजाबाबत अभिनंदन ठराव घेतला आहे. लोकांच्या मनात मोबदल्याबाबत कोणतीही शंका राहिली नसल्याने त्यांनी त्यांची महामार्गावरील बांधकामे स्वतःहून काढलेली आहेत.

-----------------

**मोताळा (जि. बुलढाणा) येथील आदिवासी विकास आयुक्त यांचेकडून दिलेल्या कंत्राटदाराने निकृष्ट अन्न धान्य पुरवठा केल्याबाबत**

**(१०९) * ४५७१८ प्रा.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडून स्वस्तिक एजन्सी, श्वेता एन्टरप्रायझेस, तिरुपती बालाजी आदिवासी बहुउद्देशिय संस्था मोताळा (जि. बुलढाणा) या संस्थेला सन २०११-२०१२ ते सन २०१५-२०१६ पर्यंत आदिवासी आश्रमशाळेला अन्नधान्य, अंडी, केळी पुरविण्याचे कंत्राट दिले असल्याचे दिनांक २५ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कंपन्यांनी निकृष्ट दर्जाचा अन्नधान्य पुरवठा केल्याने शासकिय आदिवासी आश्रमशाळेतील मुलांनी आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०११-१२ ते २०१४-१५ पर्यंत सदर वस्तुंची खरेदी प्रक्रिया आयुक्तालय स्तरावरुन करण्यात येत होती. सन २०१५-१६ या शैक्षणिक सत्रासाठी अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांचे स्तरावर सदर वस्तु खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदीची प्रक्रिया करण्यात आली आहे. सदर निविदा प्रक्रियेतील मे.महाराष्ट्र स्टेट को-ऑप कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई, श्वेता एंटरप्रायझेस, अमरावती, रिद्धि सिद्धी ट्रेडर्स, परतवाडा, मे.आशिष ट्रेडींग कंपनी, घोडेगांव, पुणे व श्री. एस. एन. प्रोटीन्स या न्युनतम दर धारकांना विविध

वस्तुंच्या पुरवठ्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सन २०१५-१६ करिता पुरवठ्याची निविदा प्रक्रिया सुरु असतांना विद्यार्थ्यांची आहाराची गैरसोय होवू नये यासाठी प्रकल्प अधिकारी यांनी स्थानिक स्तरावर वित्तीय मर्यादेत अन्नधान्याच्या तात्पुरत्या पुरवठ्याचे आदेश दिले होते. त्यावेळी मे.महाराष्ट्र स्टेट को-ऑप कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई यांनी किनवट प्रकल्पात शासकिय आश्रमशाळा, बोथडी येथे पुरविलेले अन्नधान्य निकृष्ट दर्जाचे आढळून आल्याने त्यांच्या विरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. तथापि सदर पुरवठा मे.महाराष्ट्र स्टेट को-ऑप कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई यांचे उप पुरवठादार स्वस्तिक एजन्सीज, अमरावती यांनी केला असल्याने सदर गुन्हा त्यांच्यावर वर्ग करण्यात आला आहे. तसेच शासकिय आश्रमशाळा, नांझा येथे मे.महाराष्ट्र स्टेट को-ऑप कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई यांनी पुरविलेली मिरची पावडर निकृष्ट दर्जाची आढळून आल्याने सदर माल तात्काळ बदलून घेण्यात आला आहे.

सन २०१५-१६ च्या नियमित पुरवठ्याचे आदेश दिल्यानंतर पुरवठ्याबाबत तक्रारी नाहीत.

-----------------

## राज्यातील सर्व टोल नाक्यांवर वाहनांची नेमकी संख्या कळण्याकरिता स्वतंत्र यंत्रणा बसवण्याबाबत

**(११०) * ४१२२० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व टोल नाक्यांवर वाहनांची नेमकी संख्या कळण्याकरिता स्वतंत्र यंत्रणा बसवण्याचा निर्णय एमएसआरडीसीने घेतल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच टोलनाक्यांवर वाहनांची मोजदाद करणारे सॉफ्टवेअर बसविण्यासाठी टेंडर मागविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सॉफ्टवेअर बसविल्यामुळे कारभार पारदर्शी होणार आहे काय,

(४) असल्यास, स्वतंत्र यंत्रणेमुळे टोलच्या उत्पन्नातील किती रक्कम एमएसआरडीसीला मिळणार हे ही स्पष्ट होणार आहे काय,

(५) असल्यास, राज्यभरात सदर यंत्रणा कधीपर्यंत चालू होणार आहे, नसल्यास, त्याची काय कारणे आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारित असलेल्या सर्व पथकर स्थानकावरील वाहनांची नेमकी संख्या व त्याव्दारे वसूल होणारा पथकर याची माहिती कळण्याकरीता स्वतंत्र यंत्रणा बसविण्याचा निर्णय झाला असून त्यानुसार निविदा निश्चितीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सदर यंत्रणा कार्यान्वयीत करण्यात येईल.

-----------------

**सिन्नर (जि.नाशिक) येथे सेझ विकसित करण्याबाबत**

**(१११) * ४२९८० श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील सिन्नर येथील सेझकरीता २ हजार एकर जमीन संपादीत करुन ले-आऊट तयार करुन आज सात-आठ वर्षे झाली तरी तेथे अद्याप एकही उद्योग उभारण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथे सेझ विकासासाठी जमीन उद्योजकांना देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) मेमर्स इंडियाबुल्स, इंडस्ट्रीयल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्या सिन्नर, जिल्हा नाशिक येथील १०२३.४३ हेक्टर भूखंडवरील बहुउद्देशिय विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्याच्या प्रस्तावास केंद्र शासनाने दिनांक ०५.०६.२००७ रोजी औपचारीक मान्यात दिलेली आहे.

सदर क्षेत्रापैकी १००६.९६ हेक्टर जमीनीचे क्षेत्र केंद्र शासनाच्या दिनांक २७.१०.२००९ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अधिसूचित करण्यात आले आहे.

विकासकाच्या सदर प्रस्तावास दिनांक २४.०६.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कृषी क्षेत्राला कर्जवाटप करण्याच्या नावाने राष्ट्रीयकृत, खासगी बँका व वित्त संस्थानी कोटयवधी रूपये कॉर्पोरेट कंपन्या, नागरी पतसंस्थांना दिल्याबाबत**

**(११२) * ३९७८० श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी क्षेत्राला कर्जवाटप करण्याच्या नावाने गेल्या काही वर्षात राष्ट्रीयकृत, खासगी बँका व वित्त संस्थानी कोटयवधी रूपये कॉर्पोरेट कंपन्या, नागरी पतसंस्थाना दिल्याची बाब माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी राज्य शासनाच्या वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनने मा.मुख्यमंत्र्याकडे एका निवेदनाद्वारे माहे डिसेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) शेतकऱ्यांना कर्जापासून कसे वंचित ठेवतात याची माहिती मिशनचे अध्यक्ष श्री. किशोर तिवारी यांनी मा.मुख्यमंत्र्याना लिहिलेल्या सदरहू पत्रात स्पष्टपणे

नमूद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) याबाबत कोणतेही निवेदन अथवा तक्रार अर्ज शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) असे कोणतीही तक्रार अर्ज अथवा निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दि.महाकन्झ्युमर फेडरेशन कंपनीला अप्पर आयुक्त कार्यालय, अमरावती यांचेकडून फर्निचर व साहित्य पुरवठा मध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(११३) * ४५७२३ प्रा.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दि.महाकन्झ्युमर फेडरेशन कंपनीला अप्पर आयुक्त, आदीवासी विकास विभाग, अमरावती यांचेकडुन सन २०१० ते २०१५ या कालावधीमध्ये शालेय फर्निचर व इतर साहित्य पुरवठा करण्याचे काम दिल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किनवट, धारणी, कळमनुरी, अकोला, यवतमाळ येथील कार्यालयामध्ये साहित्याचा पुरवठा करण्यात आला मात्र बाजारभावापेक्षा जास्त दराने साहित्याचे बिल काढण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमाने निवीदा न काढता दि.महाकन्झ्युमर फेडरेशन कंपनीला कोणत्या नियमात काम देण्यात आले, त्यांचे वस्तूदर काय याची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती दोषी आढळल्यास काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) हे खरे नाही.

अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांचे कार्यक्षेत्रातील प्रकल्प कार्यालये व प्रकल्पांतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळा/वसतिगृहांकरीता सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या कालावधीमध्ये प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा यांनी त्यांना प्राप्त वित्तीय मर्यादेत प्रकल्प स्तरावर निविदा प्रक्रिया राबवून कार्यालयीन स्टेशनरी (डस्टबीन, सी एफ एल बल्ब इत्यादी) व प्रकल्पस्तरीय क्रिडा स्पर्धा करीता आवश्यक साहित्य मे. महाराष्ट्र स्टेट को-ऑप कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई यांचे कडून खरेदी केली आहे. तसेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद यांनी सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात वित्तीय मर्यादेत शालेय स्टेशनरी व इतर साहित्य दरपत्रके मागवून खरेदी केले आहे. इतर प्रकल्प अधिकारी, धारणी, अकोला, किनवट, पुसद व कळमनुरी यांनी सन २०१० ते २०१५ या कालावधीत मे. महाराष्ट्र स्टेट को-ऑप कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई यांचे कडून फर्निचर व इतर साहित्य खरेदी केलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.